POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५० ● मुंबई, सोमवार, २१ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीबद्दल उद्धव ठाकरेंचं सूचक विधान

**■मुंबई | प्रतिनिधी :**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या काळात महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी सोबत असणार की नाही, याबद्दल सामानाला दिलेल्या मुलाखतीतून उद्धव ठाकरेंनी मोठं विधान केलंय.


**महापालिका निवडणुकीत एकाला चलो रे?**

ठाणे, मुंबईसह येऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीत आम्ही जिंकण्याच्या तयारीने मैदानात उतरणार असल्याचही एल्गार उद्धव ठाकरेंनी केला आहे. महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी सोबत असेल की नाही याबद्दलही उद्धव ठाकरेंनी स्पष्टच सांगून टाकलं. ते म्हणाले की, हा ज्याचा त्यांचा प्रश्न आहे. मध्यंतरी काँग्रेसशी बोलणं झालं, ते म्हणाले की, कदाचित ते स्थानिक पातळीवर विषय सोडतील. ठिक मग तसं असेल तर तसं करु. मी मुंबईला राजकीयदृष्ट्या पण महाराष्ट्रापासून वेगळी समजणार नाही. कारण मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. त्यामुळे मुंबईचा वेगळा विचार आणि महाराष्ट्राचा वेगळा विचार होऊ शकतं नाही. राज्य म्हणून प्रत्येक महापालिका ज्या आहेत, त्यांची स्वतःची स्वायत्तता आहे. त्यामुळे राजकीयदृष्ट्या त्या त्या पक्षाला जे योग्य वाटत असेल तसं करायचं असेल तसं करू, लढायचं तर नक्कीच आहे.



**मुख्यमंत्र्यांना हा माझा टोमणा नाही तर...**

देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले तेव्हा मी गुच्छा दिला होता, तेव्हाच आणि तेवढीच भेट झाली. आता सध्या त्यांच्या सहकारी, मंत्र्यांचा जे काही भानगंडी लफडी सुरु आहेत, ती मुख्यमंत्र्यांनी मोडीत काढली पाहिजे. हे मी त्यांनी कधीकाळीचे राजकीय मित्र म्हणून सांगतोय की, हा टोमणा नाही सल्ला आहे. जर ते नीती वगैरे सगळ्या गोष्टी पाळत असतील तर हे जे काही आजूबाजूला चालले आहे, अगदी त्यांच्या प्रतिमेला तडा देणारी कामं आहेत. बॅगेतील पैसे, कुठे धक्काबुक्की तर कुठे जमिनी लाटल्या जात आहेत, हे सगळं जे काही चाललं आहे, याचे प्रमुख म्हणून बदनाम शेवटी देवेंद्र फडणवीस होत आहे. आपण जे म्हणतो नो दिव्या खाली अंधार तसा हा प्रकार आहे.



पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्र जसा लोकसभेच्या वेळी जागा झाला होता, तसा तो परत जागा झाला पाहिजे. नाही तर त्यावेळी आम्ही सांगत होतो की, महाराष्ट्रातील सर्व उद्योग गुजरातला हलवण्यात येत आहे. मराठी माणूस मुंबईतून बाहेर काढला जातोय. आता जाग नाही आली तर आपले डोळे कधीच उघडणार नाही.

मुंबई महापालिकेवर शिवसेनेचाच झेंडा फडकणार असा विश्वास उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला आहे. मराठी माणसाच्या हातात मुंबई राहू नये, हा त्यांचा केवीलवाना प्रयत्न आहे. म्हणून मध्ये मध्ये ज्यांना काही किंमत नाहीय अशा लोकांकडून आम्हाला म्हणजे मराठी लोकांना मराठी भाषिकांना पेटवण्यासाठी आवाहानाची भाषा करतात. त्यांच्या या गोष्टींचा काही फरकच पडत नाही. इथले जे मराठी आणि अमराठी भाषिक आहेत ते गुणागोविंदाने राहत आहेत. अगदी रक्तदान शिबिर जे शिवसेना करते ते आम्ही कोणत्या भाषिक करत आहे असं काही पाहत नाहीत.

### राज ठाकरेंसोबत राजकीय युतीबद्दल उद्धव ठाकरेंचं मोठं विधान

मराठीच्या मुद्द्यावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे तब्बल २० वर्षांनंतर एकत्र आलेत. त्यानंतर राजकारणात अनेकांचा भुवया उंचावल्यात. आम्ही एकत्र आलोत तर समस्या कोणाला आहे, त्यांची समस्या ते पाहतील आपण का विचार करायचा असा थेट इशारा उद्धव ठाकरेंनी सामनाला दिलेल्या मुलाखतीत कोणाचं नाव न घेता दिला. त्यांनी यावेळी राज यांच्यासोबत राजकीय युतीबद्दलही स्पष्ट संकेत दिलेत.

**राज ठाकरे - उद्धव ठाकरे एकत्र आल्यानंतर...**

उद्धव ठाकरे या मुलाखतीत म्हणाले की, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यामुळे मराठी माणसाला आणि इतर भाषिकांनासुद्धा आणि मी स्पष्ट सांगतो अगदी मुसलमानादेखील, हिंदी, गुजरातीसुद्धा तुम्ही चांगल काम केलं. तो मी त्यांना झालेला आनंद बघतो. त्याचामुळे कोणाच्या पोटात दुखलं असेल तर ती पोटदुखी त्यांच्याकडे, अशा शब्दात त्यांनी टीका केली.

**राज - उद्धव ठाकरेंची राजकीय युती कधी?**

लोकांच्या मनात जे आहे ते आम्ही साकार करु किंवा होईल. मराठीच्या मुद्द्यावर एकत्र आलो पाहिजे होतं. आम्ही कायम कोणासाठी लढत आहोत. २० वर्षांनी एकत्र आलो आहोत. प्रत्येक ठिकाणी राजकारण आणलंच पाहिजे असा भाग नाही. पण मी जे म्हटलं मराठीसाठी, मराठी भाषेसाठी महाराष्ट्र जे जे करायची गरज आहे ते करण्याची माझी तयारी आहे. याविषयावर राज ठाकरेंशी चर्चाही भविष्यात होईल असे संकेत उद्धव ठाकरेंनी या मुलाखतीत दिले. ते पुढे म्हणाले की, २० वर्षांनी का होईना आम्ही एकत्र आलोत. थोड का होईना पण हे खूप मोठं आहे. त्यादिवशी मी भाषणात बोललो, आम्ही काय बोलतो यापेक्षा आम्ही एकत्र दिसणे हे जास्त महत्त्वाच आहे.

**महापालिकासंदर्भात राज ठाकरेंशी थेट फोन...**

मराठी भाषेची लढाई आणि येणारी मुंबई महापालिका निवडणूक यासंदर्भात राज ठाकरेंशी चर्चा करणार आहात का? यावर उद्धव ठाकरे स्पष्ट म्हणाले की, जर आम्ही चर्चा केली तर कुठे आणि कोणाला प्रॉब्लेम आहे. मी आता त्याला फोन उचलून फोन करु शकतो. तो मला करु शकतो. आम्ही आता भेटू शकतो. अचडण काय आहे? बाकीची लोक एकमेकांना चोरून भेटतात. आम्ही चोरून भेटणाऱ्यांपैकी नाही. आम्ही चोरूमारून काही करत नाही भेटत नाही. भेटायचं असेल तर उघड भेटू, अडचण काय त्यात आणि आम्हाला तरी?

## महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ

### अजित पवारांकडून शरद पवारांसोबत जाण्यासंदर्भात पक्षातील आमदारांशी चर्चा?

**■मुंबई | प्रतिनिधी :**

महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवू शकणारी बातमी समोर येतेय. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात २०२३ मध्ये मोठी फूट पडली. पक्षाचे संस्थापक शरद पवार आणि त्यांचे भतीजे अजित पवार यांच्यातील मतभेदांमुळे ही फूट उद्भवली. अजित पवार यांनी ३९ आमदारांसह पक्षापासून फारकत घेतली आणि भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होऊन महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले. निवडणूक आयोगाने अजित पवार गटाला अधिकृत पक्ष म्हणून मान्यता दिली आणि पक्षाचे नाव आणि 'घड्याळ' हे चिन्ह त्यांना दिले. यामुळे शरद पवार यांच्या गटाला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार' असे नवे नाव आणि 'तुतारी' हे नवे चिन्ह स्वीकारावे लागले. या फुटीमुळे पक्षाचे राष्ट्रीय पक्षाचे दर्जा गमावले आणि महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. पण आता पुन्हा दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा सुरु झालीय. अजित पवार आणि आम्ही सर्व आमदार एकत्र असतो. अशी कोणतीही चर्चा अजितदादांनी केलेली नाही, असे राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी म्हणाले.

आजच्या बैठकीत किंवा कोणत्याही बैठकीत अशी चर्चा झाली नाही, आमच्या कानापर्यंत अशी चर्चा आली नाही असे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते मेहबूब शेख म्हणाले.



शरद पवार यांच्यासोबत जाण्यासंदर्भात अजित पवारांनी आपल्या आमदारांशी चर्चा केल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली. शरद पवार आणि अजित पवार यांचे दोन्ही गट एकत्र आले तर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत फायदा होईल अशी माहिती काही आमदारांनी अजित पवारांना दिल्याची माहिती समोर आली आहे. स्वतंत्रपणे लढल्यानं ग्राऊंडवरील कार्यकर्ता विभागल्यानं ग्रामीण भागात अजित पवार आणि शरद पवार या दोनही गटाला फटका बसण्याची शक्यता काही आमदारांनी व्यक्त केली आहेत.

## नाशिक हनी ट्रॅप प्रकरणाची आमच्याकडे सीडी, वेळ आली की तिकीट लावून दाखवू : विजय वडेट्टीवार

**■नाशिक | प्रतिनिधी :**

राज्यात गेल्या आठवडाभरापासून हनी ट्रॅप प्रकरणाची चर्चा होत आहे. ७२ आजी-माजी अधिकारी आणि काही बडे नेते हनी ट्रॅपमध्ये अडकले असून या हनी ट्रॅपचा सूत्रधार नाशिकचा असल्याची चर्चा आहे. या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत उत्तर दिले होते. सध्या सभागृहात हनी ट्रॅपी प्रकरणाची चर्चा होतेय. पण ना हनी आहे ना ट्रॅप. नाना पटोलेंनी सभागृहात पेन ड्राईव्ह दाखवत बॉम्ब आणला होता असं समजतंय. पण नानाभाऊंचा बॉम्ब आमच्यापर्यंत आलाच नाही. ते गृहखात्यापर्यंत पोहोचवलंच नाहीय, असा टोला लगावतानाच कोणत्याही आजी-माजी मंत्र्याची हनी ट्रॅपची तक्रार नाही, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नाशिकच्या हनी ट्रॅपची सीडी आमच्याकडे असल्याचा दावा केलाय.





### नाशिक हनी ट्रॅप प्रकरणाची आमच्याकडे सीडी : विजय वडेट्टीवार

विजय वडेट्टीवार म्हणाले की, हनी ट्रॅपवरून ना हनी आहे ना ट्रॅप, असे मुख्यमंत्री म्हणाले. पण, त्या संदर्भात फार मोठी माहिती सरकारकडे देखील आहे आणि विरोधी पक्षाकडे देखील आहे. मागील काळात जी काही सत्तापालट झाली ती देखील अशाच सीडीमुळे झाली, इतकं मोठं ते प्रकरण आहे. त्यात खूप मोठी माणसं आहेत. त्यावर खूप काही बोलण्याची गरज नाही. ज्या वेळेस आम्ही ते दाखवू, त्यावेळेस आम्हाला दहा-वीस हजार रुपयांचे तिकीटच लावावे लागेल. ते तिकीट लावूनच आम्हाला चित्र दाखवावे लागेल. पण, त्यात निमंत्रित आणि विशिष्ट लोकांनाच बोलवावे लागेल एवढा मोठा भक्कम पुरावा त्यात आहे, असा दावा त्यांनी केलाय.

**मुख्यमंत्री महाराष्ट्राचे नुकसान का करताय? नाना पटोलेंचा सवाल**

दरम्यान, यावर काँग्रेस नेते नाना पटोले म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आईने ज्या पद्धतीने मुख्यमंत्री धडधडीत विधानसभेत खोटे बोलले, असे वक्तव्य केले. त्या आईचे अश्रू सुद्धा राज्याचे मुख्यमंत्री समजू शकत नाहीत. याचा अर्थ मुख्यमंत्र्यांनी काल दिलेले भाषण हेच खोटे होते, हे स्पष्ट होत आहे. मी अनेकदा सांगितले आहे की, महाराष्ट्रातले काही वरिष्ठ अधिकारी, मंत्री या हनी ट्रॅपमध्ये आहेत. त्याचे केंद्रबिंदू नाशिक, ठाणे आणि मुंबई आहे.

महाराष्ट्रातले महत्त्वपूर्ण दस्तऐवज या हनी ट्रॅपमुळे असामाजिक तत्त्वांच्या हाती गेले आहेत. त्याचा परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागणार आहे. महाराष्ट्राला धोका निर्माण झालेला आहे. ती गोष्ट आम्ही विधानसभेच्या माध्यमातून सरकारला सांगत होतो. मी पेन ड्राईव्ह दाखवला त्यावेळेस अध्यक्षांनी मला नको नको नको, ते आपल्याकडेच ठेवा, असे म्हटले. त्यावेळेस माझ्याकडे पेन ड्राईव्ह मागितला असता तर मी देऊन टाकला असता. ते आम्हाला जाहीरपणे दाखवता येणार नाही. कारण, अनेक कुटुंब त्यामुळे उद्ध्वस्त होतील. विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं कारण त्यांच्याजवळ देखील याबाबत माहिती असेल. पण. मुख्यमंत्री हे का लपवत आहे? महाराष्ट्राचे नुकसान का करत आहे? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

## आईचा जागीच मृत्यू, वडील गंभीर जखमी, घर बहिणींच्या नावावर केल्याचा राग

पार्वता महादेव डेबूर (६२) असे मृत आईचे तर महादेव डेबूर (६५) असे जखमी वडिलांचे नाव आहे. त्यांच्यावर यवतमाळच्या वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जितेंद्र याला दारूचे व्यसन होते. व्यसनामुळे जितेंद्र हा घर विकून टाकणार ही भीती आईवडिलांना होती. यातूनच त्यांनी गावातील जुने घर मुलींच्या नावावर केले. यावरून जितेंद्र अधिकच संतापला. रोज दारू प्राशन करून आल्यानंतर घर परत आपल्या नावावर करून घेण्यासाठी शिवीगाळ करू लागला. बुधवारी रात्री साडेआठ वाजतादरम्यान परत दारू प्राशन आला आणि त्याने वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद वाढताच त्याने फावड्याने आईवडिलांवर हल्ला केला.

**■यवतमाळ | प्रतिनिधी :**

दारूच्या आहारी गेलेल्या मुलाने फावड्याने केलेल्या हल्ल्यात आईचा जागीच मृत्यू तर वडील गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना बुधवारी रात्री साडेआठ वाजतादरम्यान बाभूळगाव तालुक्यातील यावली येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी जितेंद्र डेबूर (३५) व त्याची पत्नी सुशीला डेबूर (३०) यांना अटक केली आहे.


आई पार्वता यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू तर वडील महादेव हे गंभीर जखमी झाले. आरडाओरड ऐकून शेजारी धावत आले. त्यांनी जखमी महादेव यांना बाभूळगावच्या शासकीय रुग्णालयात हलविले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. पोलिसांनीही तातकाळ घटनास्थळ गाठले. पंचनामा करून पार्वता यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविला. घटनेवेळी जितेंद्रची पत्नी सुशीला ही हजर होती. अधिक तपास पोलिस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक चौधरी करीत आहेत.



महादेव डेबूर यांना तीन मुली आणि एक मुलगा आहे. मुलगा जितेंद्र हा व्यसनी असल्याने आपले वडिलोपार्जित घर विकून टाकणार ही भीती त्यांना सतावत होती. किमान आपले घर कुटुंबाकडे राहावे म्हणून त्यांनी ते मुलींच्या नावावर केले. हीच गोष्ट जितेंद्रला सतावत होती. मुलगा असताना मुलींना घर दिले म्हणून तो भांडू लागला. घरातील रोजचा हा वाद वाढला आणि आई पार्वता यांचा जीव गेला.

## पंधरा दिवसांच्या बाळाची ७० हजारांत विक्री

पंधरा दिवसांच्या बाळाची ७० हजार रुपयांत विक्री करून अवैध दत्तक घेतल्याप्रकरणी महिला व बालविकास विभागाने कारवाई करून सात जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. राज्यपाल हरिचंद रंगारी, सुचिता हरिचंद रंगारी रा. हसारा (तुमसर), अजित पतिराम टेंभुर्णे, सोनाली अजित टेंभुर्णे, नंदकिशोर मेश्राम, राकेश पतिराम टेंभुर्णे, पुष्पलता दिलीप रामटेके रा. घानोड (साकोली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. चाइल्ड हेल्पलाइन वर एका बाळाची विक्री झाल्याची तक्रार आली. याची चौकशी करण्यात आली असता बाळाला दत्तक देण्यात आल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी नितीनकुमार साठवणे यांनी पुरावे गोळा केले. यात साकोली तालुक्यातील एका उपकेंद्रात एप्रिल २०२४मध्ये जन्म झालेल्या बाळाला १५ दिवसांचा असताना १०० रुपयांच्या मुद्रांक शुल्कावर दत्तक लेख लिहून देण्यात आले. दत्तक घेतलेल्या पालकाकडून अवैध पद्धतीचा अवलंब करून भंडारा शहरातील नामांकित खासगी रुग्णालयात प्रसूती झाल्याचे दस्तावेज दाखवून नगर परिषद भंडारामधून नवीन जन्म प्रमाणपत्र तयार केले. सदर प्रकरणात न्यायालयाचे कोणतेही आदेश प्राप्त न करता आपसी पद्धतीने अवैध पद्धतीचा अवलंब करून बालकास दत्तक घेतल्याप्रकरणात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी साठवणे यांनी साकोली पोलिसांत तक्रार दाखल केली. या आधारावर सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.




### वर्गमित्राच्या वडिलाकडून बालिकेचा विनयभंग

अकोला जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता चौथीतील विद्यार्थिनीचा वर्गमित्राच्या वडिलाने विनयभंग केल्याची गंभीर घटना जुने शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत समोर आली. याप्रकरणी तक्रार दाखल होताच पोलिसांनी बालसंरक्षण कायद्यांतर्गत आरोपीला अटक केली आहे. सत्यपाल भीमराव सावध, असे आरोपीचे नाव आहे. तक्रारीनुसार, पीडित बालिका शाळेत जाण्यासाठी सकाळी घरून निघाली. वर्गमित्र असलेल्या सावध याच्या मुलाला बोलविण्यासाठी घरी गेली. त्याची तयारी बाकी असल्याने सत्यपाल याने आपल्या मुलाचा टाय लावून देण्याचे बालिकेला सांगितले. ही संधी साधून त्याने बालिकेच्या तोंडावर हात फिरवित अंगाला वाईट उद्देशाने स्पर्श केला. ती रडायला लागली असता आईला न सांगण्याविषयी बजावले. त्याच्या तावडीतून सुटका करीत बालिकेने पळ काढला. शाळेत गेल्यानंतर ती शाळेच्या बाथरूमजवळील पायऱ्यांवर बसून होती. वर्गशिक्षिकेने विश्वासात घेऊन चौकशी केली असता हा गंभीर प्रकार समोर आला. शिक्षिकेने याविषयीची माहिती पालकांना दिली. त्यांनी तातडीने शाळा गाठून पोलिसांत तक्रार दाखल केली. याची दखल घेत गुन्हा दाखल करण्यात आला.

## संपाने घेतला बळी



**■ठाणे | प्रतिनिधी :**

ॲपआधारित टॅक्सीसेवा देणाऱ्या कंपन्यांकडून चालकांना अयोग्य मोबदला मिळत असल्याने चालकांनी संप पुकारला आहे. संपात सहभागी झालेल्या सनोज सक्सेना यांनी विषप्राशन करून आत्महत्या गुरुवारी केली. अन्य चालकांकडून सनोज सक्सेना यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आझाद मैदानात सभेचे आयोजन करण्यात आले आहे.चालकांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र केशव सभेचे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी आमरण उपोषणाची हाक दिली आहे. दरम्यान, गुरुवारीही चालकांचा संप सुरूच असून चालक सहभागी झाले होते. नालासोपारा पूर्वेकडील धानीव बागमधील श्रीधर कंपाउंड परिसरात सनोज पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा यांच्यासह राहत होते. ओला, उबर, रॅपिडो अशा ॲप आधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांसाठी ते टॅक्सी चालवून प्रवासी वाहतूक करत होते. ॲप आधारित टॅक्सी कंपन्यांकडून अयोग्य मोबदला मिळत असल्याने ते त्रासले होते. याच त्रासातून बुधवारी रात्री सनोज यांनी विष प्राशन केले आणि गुरुवारी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूने ॲपआधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांकडून चालकांची होणारी पिळवणूक अधिक प्रखरपणे समोर आली आहे.

## पुष्पा स्टाईलने गांजाची तस्करी

### २८ लाख रुपये किंमतीचा १०६ किलो गांजा जप्त

**■नागपूर | प्रतिनिधी :**

नागपूरमध्ये पुष्पा स्टाईलने गांजाच्या तस्करीचा प्रकार पुढे आला आहे. ट्रकमधील फ्लोवरच्या खाली स्वतंत्र कप्पे करुन १०६ किलो गांजा ओडिशा राज्यातून नागपूरमध्ये आणला जात होता. जवळपास २८ लाख रुपये किंमतीचा हा गांजा होता. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे नागपूर-हैदरबाद मार्गावर सापळा रचण्यात आला होता.

चालक ताजमोहमद शेख व क्लीनर रामलखन गुप्ता याला ताब्यात घेतले आहे. सुरुवातीला आरोपी पोलिसांना सहकार्य करत नव्हते. पोलिसांनी कसून चौकशी केली असता गांजा तस्करीचा नवीन फंडा बघून पोलिस देखील चरकारवून गेले आहेत. या प्रकरणात पोलिसांनी २ आरोपीला अटक केली असून आरोपीचा आंतरजीय टोळीचा संबंध पुढे आल्याने या प्रकरणाची कसून चौकशी केली जात आहे.



## वसईमध्ये रूग्णालयाच्या खोलीतच चालू होती अनधिकृत औषधांची विक्री

**■ठाणे | प्रतिनिधी :**

वसईमध्ये अन्न आणि औषध प्रशासनाने मोठी कारवाई करत एका रुग्णालयाच्या खोलीत विनापरवाना औषध दुकान चालवणाऱ्या व्यक्तीला पकडले. बारावी पास असलेल्या या व्यक्तीने सुमारे ८५ हजारांची औषधे साठवून ठेवली होती, जी एफडीएने जप्त केली आहेत.

वसईमध्ये अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. एका बारावी पास व्यक्तीने रुग्णालयाच्या खोलीत परवानगी नसताना औषध दुकान थाटले होते. अन्न आणि औषध प्रशासनाने धाड टाकून ८५ हजारांची औषधे जप्त केली. या प्रकरणी अधिक तपास करून संबंधितांवर कोर्टात खटला दाखल करण्यात येईल, असे एफडीए अधिकाऱ्यांनी सांगितले.

वसईमध्ये एक व्यक्ती रुग्णालयात खोली घेऊन औषधे विकत असल्याची माहिती एफडीएला मिळाली होती. या माहितीनंतर अधिकाऱ्यांनी याबाबत अगोदर खातरजमा करण्याचा निर्णय घेतला. औषधांचे प्रिस्क्रिप्शन घेऊन एक माणूस त्या व्यक्तीकडे गेला. त्याने औषधे विकल्याचे उघड झाले. त्यानंतर एफडीएच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी (गुरूवारी) त्या ठिकाणी छापा मारून त्यांनी ८५ हजारांची औषधांचा साठा जप्त केला, अशी माहिती सहाय्यक आयुक्त (औषध) महेश गाडेकर यांनी दिली. जप्त केलेल्या औषधांमधील दोन नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

अन्न आणि औषध प्रशासनाच्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. विनापरवाना औषध विक्री करणे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे नागरिकांनी अधिकृत दुकानांमधूनच औषधे खरेदी करावीत, असे आवाहन एफडीएने केले आहे.

"मागील सात ते आठ महिन्यांपासून तो व्यक्ती औषधांची विक्री करत असल्याची बाब चौकशीमधून समोर आली आहे, तसेच संबधित व्यक्तीचे पूर्वी औषधविक्रीचे दुकान होते. मात्र, नंतर त्याने औषध विक्रीचा परवाना रद्द केला होता", असे एफडीए अधिकाऱ्यांनी सांगितले. "त्यानंतर त्याने रुग्णालयात खोली घेऊन तेथून विनापरवाना औषधांची विक्री सुरू केल्याचे एफडीएच्या अधिकाऱ्यांनी सांगितले," असेही ते म्हणाले. ₹रुग्णालयातच औषधांची विक्री होत होती, ही बाब चौकशीत उघड झाली आहे,₹ असे अधिकाऱ्यांनी सांगितले.





## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# प्रत्यक्षात कृती गरज आहे...

मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ ९ जून रोजी झालेल्या भयंकर रेल्वे दुर्घटनेचा विषय नुकताच राज्याच्या विधिमंडळात चर्चेला आला होता. या विषयावर मुंबईच्या लोकप्रतिनिधींकडून जितक्या गांभीर्याने चर्चा व्हायला हवी होती, दुर्दैवाने तशी न झाल्याने सर्वसामान्यांचा नक्कीच भ्रमनिरास झाला असेल. उपनगरीय लोकल ट्रेन हा महामुंबईत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. कामधंद्यासाठी मुंबईच्या एका टोकापासून दुसरे टोक गाठणारा सर्वसामान्य मुंबईकर हा आपल्या आयुष्यातील जवळपास निम्मा काळ लोकल ट्रेनमध्ये घालवतो, असे म्हटले जाते. यात बऱ्याच प्रमाणात तथ्यही आहे. मुंबईकरांची सकाळ होते तीच मुळात लोकल ट्रेनच्या टायमिंगने. आपल्याला अमूक तमूक वेळेची लोकल पकडायची असल्याने त्यानुसारच झोपेतून उठून सकाळची कामे उरकली जातात. सायंकाळी-रात्री आपापल्या कामधंद्याच्या ठिकाणाहून निघून घर गाठण्यासाठीही हीच तऱ्हा. मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचे वेळापत्रक हे लोकल ट्रेनच्या टाईम टेबलशी जुळलेले असते. या वेळापत्रकात काही गडबड झाली की पुढच्या कामांचे नियोजन बिघडलेच म्हणून समजा. मुंबईच्या मध्य, हार्बर, ट्रान्स हार्बर, पश्चिम रेल्वे मार्गावरून पहिल्या लोकलपासून ते शेवटच्या लोकलपर्यंत सरासरी ७५ लाख प्रवासी दररोज प्रवास करतात. ही प्रवासी संख्या जगात इतर कुठल्याही सार्वजनिक प्रवासी सेवेतील सर्वाधिक प्रवासी संख्या असेल. त्याचवेळेस लोकल ट्रेनमधून पडून वा अन्य कारणांमुळे मृत्यूमुखी पडणाऱ्या तसेच जखमी होणाऱ्या प्रवाशांची संख्याही नक्कीच सर्वाधिक असेल. राज्याचे सार्वजनिक परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी लोकल ट्रेनमधून पडून मृत्यूमुखी पडलेल्या प्रवाशांचा आकडा विधानसभेत सांगितला. मुंबई उपनगरीय रेल्वे अपघातात मागच्या ३ वर्षांत ७,५६५ प्रवाशांचा मृत्यू झाला असून ७,२९३ प्रवासी जखमी झाल्याची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली. हा आकडा ऐकून अंगाचा नुसता थरकाप झाला. ही संख्या कमी होण्याची कुठलीही चिन्हे सध्या तरी दिसून येत नाहीत. स्वतःला मुंबईकर म्हणवून घेणारा माणूस केव्हाच मुंबईच्या सीमेतून हद्दपार झालेला आहे. वांद्रे ते वसई-विरार, पालघर, कुर्ला ते ठाणे-कल्याण, बदलापूर, अंबरनाथ, कर्जत-कसारादरम्यानच्या उपनगरांमध्ये राहणायांची संख्या कोटींच्या घरात आहे. त्यापैकी लाखो प्रवासी मुंबईच्या शेवटच्या टोकापासून दररोज कामधंद्यांच्या निमित्ताने लोकल ट्रेनमधून प्रवास करत मुंबई गाठतात. गर्दीने खच्चून भरलेल्या लोकलमध्ये गुराढोरासारखे चढतात, आत पाय ठेवायला जागा नसल्यावर अक्षरशः दरवाजाला लोंबकळत प्रवास करतात. असा जीवघेणा प्रवास करताना कधी कुणाचा हात सुटतो, कधी कुणाचा तोल जातो तर कुणाला पोलचा फटका बसतो. मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ घडलेला अपघातही त्यापैकीच एक. एकमेकांच्या शेजारून जाणाऱ्या ट्रेनमध्ये लटकलेल्या प्रवाशांच्या बॅगा घासल्या गेल्या आणि क्षणाधार्थ ८ प्रवासी ट्रॅकवर पडले. यापैकी ७ प्रवाशांचा मृत्यू झाला. एकाचवेळी ही दुर्घटना घडल्याने सर्वांचे लक्ष या घटनेने वेधून घेतले हे निश्चित. कारण दररोज असे कितीतरी अपघात होत असतात. त्यात अनेकांचा मृत्यूही होत असतो, पण मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबाकडे रेल्वे प्रशासन व लोकप्रतिनिधी यापैकी कुणी ढुंकूनही पाहात नाही. भारतात मरण किती स्वस्त आहे हे कुणाला पाहायचे असेल तर त्याने रेल्वे अपघातांमध्ये मृत्यूमुखी पडणाऱ्यांचा आकडा बघावा. काही अपवाद वगळले तर कुणी हौसेखातर असा प्रवास करत नाही. मुंबईशी कनेक्टिव्हिटी असलेला इतर कुठलाही सक्षम पर्याय नसल्याने पोटापाण्यासाठी नाईलाजास्तव प्रवाशांना जीवावर उदार होऊन असा प्रवास करावा लागतो, हे इथे समजून घेतले पाहिजे. मागच्या काही वर्षांमध्ये रेल्वे प्रशासनाने भाडेवाढ करून प्रवाशांसाठी स्वयंचलित दरवाजांच्या एसी लोकल सेवेत आणल्या. परंतु या लोकल चालवताना सामान्य लोकलच्या फेऱ्या कमी करण्याचेही कामही केले. सर्वसामान्य प्रवासी या ट्रेनमध्ये चढू शकत नाही. त्यामुळे एसी लोकलच्या मागून येणाऱ्या ट्रेनमधील दुप्पट गर्दीचा प्रवाशांना सामना करावा लागतो. बदलापुरातील रेल्वे स्थानकात एसी लोकलविरोधात प्रवाशांनी उग्र आंदोलन केले होते. अद्यापही या समस्येवर तोडगा निघालेला नाही. मुंब्रा अपघातानंतर सर्वच लोकल स्वयंचलित दरवाजाच्या एसी लोकल करायच्या आणि त्याचे भाडेही माफक ठेवायचे यावर असा विचार रेल्वे प्रशासनाने सुरू केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. हा विचार रेल्वेला मुंब्रा अपघाताच्या आधी का सुचला नाही? प्रताप सरनाईक यांनी मुंबई लोकलमध्ये होणाऱ्या गर्दीवर तोडगा म्हणून सरकारी कर्मचाऱ्यांना कार्यालयात हजर होण्याच्या वेळेत अर्धा तासाची सवलत दिल्याचे सांगितले. खासगी आस्थापनांमधील कार्यालयाच्या वेळांवर अभ्यास करण्यासाठी कृती समिती नेमण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली. हा विषय काही आजचा नाही. नाही म्हटले तरी मागच्या ५ ते १० वर्षांपासून खासगी, सरकारी कार्यालयांच्या वेळा बदलण्याचे गुऱ्हाळ सुरूच आहे. खुद्द मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सूचना करूनही हा विषय रेंगाळलेला आहे. मेट्रोचे जाळे टप्प्याटप्प्याने विस्तारत आहे. ही एक दिलासादायक बाब असली तरी, मेट्रोचे जाळे संपूर्ण महामुंबईत पसरायला किमान एक दशक किंवा त्याहून जास्त काळ लागण्याची शक्यता आहे. तोपर्यंत लोकलवरील ताणाचे काय करायचे? वर्सोवा ते घाटकोपर मेट्रो सुरू होऊन एक दशक उलटून गेले आहे. सद्यस्थितीत तुम्ही कुठल्याही वेळेत मेट्रो वनवर जा तुम्हाला तिथेही हमखास गर्दी दिसून येते. एल्फिन्स्टन रेल्वे स्थानकातील ब्रिजवर झालेली चेंगराचेंगरी असो किंवा मुंब्रा दुर्घटना हे सर्व अनियंत्रित गर्दीचाच परिणाम आहे. त्यामुळे लोकल प्रवाशांचे मृत्यू रोखायचे असतील, तर गर्दी नियोजनाचा विषय रेल्वे प्रशासन व राज्य सरकारच्या अजेंड्यावर हवा. त्यासाठी कृती समितीच्या घोषणेऐवजी प्रत्यक्ष कृती करण्याची खरी गरज आहे.



# भिवंडी-वाडा-मनोर रस्त्याबाबत केंद्र सरकार उदासीन!

**ठाणे जिल्हा आणि पालघर जिल्ह्याला जोडणारा भिवंडी-वाडा-मनोर रस्ता हा थेट ग्रामीण भागातील नागरिकांना शहराशी जोडतो. लाखो नागरिक या रस्त्यावरून ये-जा करतात. किरकोळ कामाकरितादेखील मुख्य मार्ग हा नागरिकांना अवलंबावा लागत असल्याने नागरिक, शाळेत जाणारी मुले या रस्त्यावरून दररोज ये-जा करत आहेत. या मार्गावरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहने मुंबई-गुजरात परिसरातून ये-जा करत असतात. केंद्र शासनाने देशभरात खूप चांगल्या प्रकारे कामे करून उत्कृष्ट रस्ते बनवलेले आहेत. मग या भिवंडी-वाडा-मनोर रस्त्याकडे केंद्र सरकार का दुर्लक्ष करत आहे, हाच मोठा प्रश्न ग्रामीण भागातील नागरिकांना पडला आहे.**

भिवंडी-वाडा-मनोर या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे कार्यालयात जाणाऱ्या नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. शाळेत जाणाऱ्या मुलांना जीव मुठीत घेऊन जावा लागतो. अशा परिस्थितीत हा रस्ता वेळीच का व्यवस्थित केला जात नाही हाच मोठा प्रश्न नागरिकांना सतत पडत असतो. प्रत्येक वर्षी रस्ता खराब होत असल्याने एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदी असताना त्यांनी स्वतः या रस्त्याची पाहणी केली होती. त्यानंतर ८०१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला.

तेव्हापासून या रस्त्याचे काम सुरू आहे. कामाला सुरुवात झाली आहे. पण दोन्ही बाजूकडील रस्ता थोडा, थोडा सिमेंट काँक्रिटीकरण करत असल्याने मधल्या भागातील रस्त्यावर खड्डे पडले आहेत, यामुळे स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला साथदेखील देणे आवश्यक आहे. या रस्त्यासाठी ईगल इन्फ्रा कंपनीला निधी देण्यात आला आहे तर ८० कोटी या मार्गावर काँक्रीट पॅच मारण्यासाठी मंजूर करण्यात आले.

काही अंतरावर दोन ते तीन किलोमीटरपर्यंत सिमेंट काँक्रिटीकरणांचे काम झाले आहे. पण एका बाजूने तीन किलोमीटर तर दुसऱ्या बाजूने दोन किलोमीटर असे काम होत असल्याने मध्यभागी पडलेल्या खड्डयामुळं प्रवास जीवघेणा झाला आहे. हा भिवंडी-वाडा-मनोर रस्ता सिमेंट काँक्रिटीकरणाने पूर्ण झाला की, पुढील २५ ते ३० वर्षे नागरिकांची चिंता मिटेल, अशी अपेक्षा आहे.

भिवंडी-वाडा रस्ता प्रत्येक वर्षी पावसाळ्यात खड्डेमय स्थितीत असतो. यावर्षी तर नेहमीसारखे खड्डे झाले असून या रस्त्यावरून प्रवास करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखं झाले आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे साचलेल्या पाण्यात खड्ड्यांचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. अनेक ठिकाणी ट्रक आणि इतर मोठी वाहने खड्डयात पलटल्याच्या घटना घडल्या आहेत, ज्यामुळे मोठे नुकसान झाले आहे.

सध्या भिवंडी-वाडा-मनोर रस्ता मृत्यूचा सापळा झाला आहे. या ६४ किमी रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. तब्बल ८०१ कोटी रुपयांचा निधी ईगल इन्फ्रा कंपनीला देण्यात आला आहे तर ८० कोटी या मार्गावर काँक्रीट पॅच मारण्यासाठी मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे या मार्गावर ८८१ कोटी मंजूर झाल्यानंतरही कामांचा दर्जा आणि गती अत्यंत संथ असून, नागरिकांच्या जीवाला रोज धोका निर्माण झाला आहे.

या मार्गावर २०१५ ते २०२५ वर्षापर्यंत झालेल्या अपघातात सुमारे ५०० जणांना जीव गमवावा लागला आहे. तर अनेकजण जखमी झाले असल्याची आकडेवारी समोर येत आहे. या रस्त्याच्या अपूर्ण कामाकडे लक्ष वेधण्यासाठी पाच वर्षात अनेक आंदोलने झाली. मात्र प्रशासन याकडे गांभीर्याने बघत नसल्याने आजही निष्पाप लोकांचे जीव जात असून संसार उघड्यावर पडले आहेत. प्रशासन आता जागृत झाले. स्थानिक आमदार आणि लोकप्रतिनिधी यांच्यात झालेल्या बैठकीत भिवंडी-वाडा-मनोर रस्त्यावर पडलेले खड्डे भरण्याचे काम सुरू झाले आहे.

तसेच खड्ड्याच्या बाजूला पडलेली रेती आणि खडी बाजूला करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. तसेच सिमेंट काँक्रिटीकरणाचे एका बाजूचे काम या वर्षाच्या कालावधीत लवकर पूर्ण करण्यात येईल. एका बाजूचा रस्ता खड्डेमय नसेल, असे ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्थानिक खासदार, आमदार आणि लोकप्रतिनिधी यांच्यात झालेल्या बैठकीत जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. यामुळे स्थानिक नागरिकांनीदेखील जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावे, असेदेखील लोकप्रतिनिधी सांगत आहेत.

यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीलाच भिवंडी-वाडा-मनोर रस्त्याची सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्याच्या पॅच सोडला तर अक्षरशः चाळण झाल्यामुळे वाहतूक कोंडीचा फटका वाहन चालकांना बसत असल्याने जून महिन्यात स्थानिक लोकप्रतिनिधींनीदेखील या रस्त्याची पाहणी केली. या रस्त्याचे दुरुस्तीचे काम जिजाऊ कन्स्ट्रक्शन कंपनी करत आहे. या कंपनीचे काम रस्ते दुरुस्त करणे आहे, रस्त्यांवरील खड्डयांकडे दुर्लक्ष न करता, खडी व रेती टाकून ते बुजवावेत असे लोकप्रतिनिधी यांनी पाहणीदरम्यान प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना सांगितले.

काही दिवसांपूर्वी श्रमजीवी संघटनेच्या वतीने या मार्गावर १२ तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. यामुळे या मार्गावरील वाहतूक व्यवस्था कोलमडली होती. एसटीची वाहतूकदेखील ठप्प झाली होती. संथगतीने सुरू असलेल्या या मार्गावरील कामामुळे नागरिकांना वाहतूक समस्येला सामोरे जावे लागत असल्याने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. मागील १२ वर्षे या रस्त्याला दुरुस्तीकरिता निधी मिळत आहे.

तरीही हा रस्ता अद्याप सुसज्ज असा झाला नाही. या महामार्गाची अवस्था अक्षरशः दयनीय झाली असून वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे आक्रमक झालेल्या स्थानिकांनी १० ऑगस्ट-२०२३ रोजी रास्ता रोको आंदोलन केले होते. वाडा-भिवंडी महामार्गावरील कुडूस येथे हा महामार्ग स्थानिकांनी रोखून धरला. तब्बल दीड तासांपेक्षा अधिक काळ या महामार्गावर रास्ता रोको करण्यात आल्याने महामार्गावरील वाहतूकदेखील विस्कळीत झाली.

आंदोलनावेळी ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्यांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावर्षी हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी या मार्गावर अपघातात एका मुलीचा जीव गेला होता, यामुळे या रस्त्याचा विषय थेट अधिवेशनात निघाल्यामुळे १८ डिसेंबर २०२३ रोजी विधान परिषद सदस्यांनी या रस्त्याच्या दुरवस्थेचा मुद्दा उपस्थित करून कंत्राटदारावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी केली होती. त्यावर सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनीदेखील या प्रश्नावर जिजाऊ कन्स्ट्रक्शनला काळ्या यादीत टाकण्याची घोषणा करत एसआयटी चौकशी करण्याचे सूचित केले होते.


पण या घोषणा महायुती काळात कागदावरच राहिली असल्याचे अभ्यासक सांगत आहेत. रस्ते अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार जिजाऊ कन्स्ट्रक्शन यांनी रस्त्याची कामे केली होती, मग तरीही हा मुद्दा अधिवेशनात कसा आला, याचीही माहिती अद्यापही समोर आली नाही. या रस्त्याचे सुमारे ४० किलोमीटरचे काम ईगल इन्फ्रा कंपनीला देण्यात आले आहे.

भिवंडी-वाडा-मनोर हा महामार्ग मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला पर्यायी महामार्ग म्हणून समजला जातो. मात्र सध्या या महामार्गाची अवस्था 'जैसे थे'च पाहायला मिळत आहे. वारंवार तक्रारी करूनदेखील सार्वजनिक बांधकाम विभाग या महामार्गाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करत आहे. ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्यांचे चांगले संबंध असल्याने हा महामार्ग खड्डेमय झाल्याचा आरोप येथील स्थानिक नागरिकांकडून करण्यात आला आहे.

पण आता प्रशासनाने देखील हा रस्ता खड्यापासून मुक्त करण्याची तयारी केली आहे. स्थानिक नागरिकांनीदेखील सहकार्य करावे, असे ठाणे जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकप्रतिनिधींना सांगण्यात आले आहे. कारण एकदा रस्ता सिमेंट काँक्रिटीकरणाने पूर्ण झाला की, पुढील २५ ते ३० वर्षे नागरिकांना उत्कृष्ट दर्जाचा रस्ता मिळणार आहे. अवघ्या एका महिन्यात गणेशोत्सवाला सुरुवात होईल.

भिवंडी तालुका आणि वाडा तालुका परिसरातील ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात गणेशोत्सव सण साजरा केला जातो. गणेशाच्या मूर्ती याच भिवंडी-वाडा-मनोर मार्गावरून नागरिक घरी घेऊन जातात. आता पावसाने पडलेल्या खड्डयामुळे नागरिकांनाच वाहनातून जाताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. यामुळे गणेशोत्सवात श्री गणेशाच्या मूर्ती घेऊन जाण्यापूर्वी तरी हा रस्ता खड्डेमुक्त करा, अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिक करत आहेत.

# दिव्यांग कल्याण मंत्रालयालाच सहाय्याची गरज!



**महाराष्ट्रात दिव्यांग कल्याण हा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग स्थापन करण्यात आला आहे. विभागाकडून दिव्यांग व्यक्तींना विशिष्ट सेवासुविधा पुरविल्या जाणे अपेक्षित असते. परंतु प्रत्यक्षात दिव्यांग कल्याण मंत्रालयालाच सहाय्याची गरज निर्माण झाली आहे.**

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या दि. २९.११.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५.१२.२०२२ च्या अधिसूचनेन्वये दिव्यांग कल्याण हा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग स्थापन करण्यात आला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रामध्ये २९,६३,३९२ दिव्यांग व्यक्ती असून, त्यांची संख्या महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या २.६३% आहे. शारीरिक, बौद्धिक, संवेदनाक्षम आणि विकासात्मक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांच्या उपक्रमांद्वारे विभागाकडून सहाय्य केले जाते.

अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ नुसार २१ प्रकारच्या अपंगत्वांना दिव्यांगाचा दर्जा दिला आहे; मात्र यापूर्वीपासून महाराष्ट्रात अंध, अस्थिव्यंग, बौद्धिक अक्षम व कर्णबधिर शाळांना शासनाचे अनुदान मिळत आहे. शाळेत आलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे पुनर्वसन व्हावे यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात अनेक शाळा कार्यरत आहेत. त्यात शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळा सामाजिक संस्थां (एनजीओ)मार्फत चालवण्यात येत असल्या तरी विद्यार्थ्यांच्या पटानुसार शाळांना कर्मचारी, त्यांचे वेतन व वेतनेतर अनुदान मिळत असते. मात्र, दिव्यांगांच्या या शाळांकडे महाराष्ट्र सरकारचे लक्ष नाही. ज्यासाठी शासनाने दिव्यांग मंत्रालय सुरू केले, त्या मंत्रालयातील दिव्य कार्यपद्धती पाहता दिव्यांग कल्याण मंत्रालयालाच आता सहाय्याची गरज असल्याचे जाणवत आहे.

दिव्यांग कल्याण मंत्रालय हे महाराष्ट्र सरकारमधील एक मंत्रालय आहे, जे सामाजिक न्याय मंत्रालय (महाराष्ट्र) पासून वेगळे करून ९ जानेवारी २०२३ रोजी तयार करण्यात आले. या मंत्रालयाचे नेतृत्व कॅबिनेट स्तरावरील मंत्री करतात. अतुल सावे हे सध्या अपंग कल्याण मंत्री आहेत. मात्र त्यांनी या मंत्रालयाचा आणि तेथील विषयांचा किती वेळा आढावा घेतला असेल, हा संशोधनाचा विषय आहे. कारण अपंग शाळांसाठी शाळा चालवण्यासाठी शासनाचे जे वेतनेतर अनुदान मिळत होते, ते गेले अनेक वर्षं या शाळांना मिळालेले नाही. विद्यार्थ्यांना दरमहा मिळणारी शासनाची शिष्यवृत्तीदेखील अद्याप मिळालेली नाही. तसेच शाळेत कार्यरत अनेक कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देखील मिळालेली नाही. या सर्व गोष्टी शासनाने पारित केल्या आहेत, मात्र मुलांपर्यंत, शाळेपर्यंत व कर्मचाऱ्यांपर्यंत त्या पोहोचलेल्या नाहीत, अथवा पोहोचत नाहीत. अनेक शाळांतील कनिष्ठस्तर मुख्याध्यापक हे पद सेवार्थातून अचानक लुप्त झाले आहे आणि ते पुनरुज्जीवित करण्यासाठी भलीमोठी अशक्यप्राय प्रक्रिया मंत्रालयातून सांगितली जात आहे. मुळात सेवार्थ प्रणालीतून अशा प्रकारे पद लुप्त होणे हेच आश्चर्यजनक आहे.

दिव्यांग कल्याण मंत्रालय स्थापन तर झाले. परंतु त्यांचा या शाळकरी दिव्यांगांना व त्यांच्या शाळांना काहीच फायदा होत नाही. याउलट प्रत्येक गोष्टीसाठी सहाय्यक आयुक्त, उपायुक्त, आयुक्त नंतर मंत्रालय अशा फाइल्स फक्त फिरत असतात; मात्र त्यावर कार्यवाही पुढे सरकत नाही. अनेक सहाय्यक आयुक्त कार्यालयात शासनाच्या वतीने जबाबदार कर्मचारी नियुक्त नाहीत. जे आहेत ते प्रभारी. त्यामुळे कामाला वेग येत नाही. दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकविण्याचे विशेष प्रशिक्षण घेतलेले शिक्षक बीएड, एम.एड., पीएच.डी. असले तरी त्यांना प्राथमिकच पगार मिळतो. असे असले तरी दिव्यांगांना शिकवण्याचे महत्कार्य हे शिक्षक मोठ्या आनंदाने व कसोशीने करत आहेत. अनेक शाळांना अनुज्ञप्तीच्या नावाखाली एप्रिल महिन्यापासून व सर्व शाळांना पटनिर्धारणासाठी मे महिन्याचा पगार प्राप्त झालेला नाही.

पूर्वी अस्थिव्यंग गटामध्ये पोलिओची मुले जास्त प्रमाणात असत. परंतु आत्ताच्या स्थितीत पोलिओचे प्रमाण शून्य असून, चलनवलन समस्या असणारी बहुविकलांग मुले जास्त प्रमाणात आहेत. यामध्ये सेरेब्रल पाल्सी, मेनिंगोमायलोसेल, मस्क्युलर डिस्ट्रॉफी, ऑस्टेओजेनिसिस इंपरफेक्टा, डॉर्फिझम अशा विविध प्रकारच्या अपंगत्वांच्या समस्यांमुळे ग्रस्त मुले या गटात येतात. अशा मुलांना सर्वसामान्य मुलांच्या शाळेत प्रवेश घेतल्यास भरपूर अडचणी येतात. एकतर ते अभ्यासात मागे पडतात, शिवाय त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होतो. यापैकी बहुतेक मुले क्रचेसच्या आधारे चालतात किंवा व्हिलचेअर बाऊंड असतात. अशा मुलांना सर्वसामान्य शाळेत सहजरीत्या हालचाल करता येत नाही. विशेष शाळांमध्ये या मुलांसाठी उत्तम व्यवस्था केलेली असते. जसे वर्गरचना, प्रसाधनगृहातील सोयीसुविधा, उत्तम प्रशिक्षक वर्ग, शाळेच्या आवारातील सोयी, काळजीवाहक तसेच सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बस सुविधा, बस मदतनीस, बसचालक, समाजसेवक, व्यवसाय उपचारतज्ञ, वाचा उपचारतज्ञ - या सर्वांच्या आधारे या मुलांचा सर्वांगीण विकास होतो. अस्थिव्यंग शाळांना १८ ऑगस्ट २००४ च्या शासन निर्णयानुसार शिक्षक-विद्यार्थी प्रमाण २५ विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक, ५० विद्यार्थ्यांसाठी एक काळजीवाहक असे केले आहे. परंतु त्यामुळे या मुलांवर अन्याय होतो आहे. तसेच समाजसेवक, बसचालक, बस मदतनीस ही पदे देखील व्यपगत केली आहेत. त्यामुळे अशा मुलांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना शाळा चालवणे फार कठीण जात आहे.

शासनाचा सर्वशिक्षा अभियानांतर्गत दिव्यांग शाळा बंद करण्याचा मनोदय असला, तरी दिव्यांगत्वानुसार या विद्यार्थ्यांच्या महत्त्वाच्या गरजा फक्त त्यांच्यासाठी कार्यरत विशेष शाळा व त्याचे प्रशिक्षण घेतलेले शिक्षकच पूर्ण करू शकतात. याचा शासनाने सहृदयतेने विचार करायला हवा.

कर्णबधिर मुलांचा सर्वसामान्य शाळांमध्ये पुनर्वसन करण्याचा प्रयत्न सपशेल फसलेला आहे. कॉक्लिअर इंप्लान्ट केल्यावर नियमानुसार ही मुले पाच ते सहा वर्षे सामान्य शाळेत जातात. परंतु पहिली-दुसरीचा कठीण अभ्यास सुरू झाल्यावर, तो अभ्यास न समजल्यामुळे त्यांना परत विशेष शाळेत पाठवावे लागते. तेव्हा त्यांचे वय सात-आठ वर्षांचे झालेले असते. अशा वेळी त्यांना शिशुवर्गापासून पुन्हा सुरुवात करावी लागते. जेव्हा हे मूल परत पहिलीत पोहोचते, तेव्हा ते दहा वर्षांचे होते. सातवीत पोहोचायला १८ वर्षांचा होतो. त्यामुळे शासनाच्या सरल, युडायस यासारख्या पोर्टलवर नोंदणी होत नाही. यामुळे पटावर विद्यार्थी नसल्याचे भासते, अनुदान मिळत नाही. ही मुले शाळेत असली तरी ते शिक्षक मिळत नाहीत, डोनरच्या देणगीवर शिकवले जाते. पटनिर्धारणात नसल्यामुळे शिक्षकही मिळत नाहीत. त्यामुळे ही मुले शाळाबाह्य होतात. पालकांनी शासनाकडे केवळ न्यायाची माफक अपेक्षा ठेवली आहे. पण त्यांचा आवाज पोहोचत नाही. राग व्यक्त करायलाही ते शासन 'बहिरे आहे' असं म्हणू शकत नाहीत - कारण त्यांचं अपत्यच बहिरं असण्याचं दुःख तेच जाणतात.

समाजकल्याण विभागांतर्गत २००५ नंतर नवीन पेन्शन योजनेंतर्गत भरती झालेले शिक्षक कर्मचारी आहेत. त्यांच्या पगारातून १० टक्के रक्कम डीसीपीएसमध्ये जमा केली जाते, परंतु शासनाचा हिस्सा, व्याज व प्राण नंबर अजूनही नाही. कर्मचाऱ्यांना स्वतःच्या पैशाचे काय होते, याची माहिती नाही. हा सर्वात मोठा घोटाळा आहे, असे समाजकल्याण विभागातीलच कर्मचारी सांगतात. शासनाकडून जे जीआर निघतात, ते दिव्यांग मंत्रालयासाठी स्वतंत्रपणे लागू करणे आवश्यक असते. समाजकल्याण विभागाकडून स्वतंत्र जीआर न निघाल्यामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. उदाहरणार्थ, २०२४ मध्ये निघालेला जुनी पेन्शन योजना लागू करणारा जीआर. विभागाकडून कोणतीही हालचाल न झाल्यामुळे संबंधित शिक्षक या योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत. सातवा वेतन आयोग लागू होऊनसुद्धा, बारा वर्षे व २४ वर्षांची सेवा झालेल्या शिक्षकांना चटोपाध्याय आयोगानुसार वेतनश्रेणी दिलेली नाही. कारण, विभागाचा स्वतंत्र जीआर नाही, हे कारण पुढे करून टाळाटाळ केली जाते.

दिव्यांगांच्या समस्या त्वरित सुटाव्यात, यासाठीच हे मंत्रालय स्थापन झाले. मात्र सरकार या मंत्रालयाला पूर्णवेळ मंत्री व अधिकारी देत नसेल, तर त्याचा काय उपयोग? दिव्यांग व्यक्तींमध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक, संवेदी आणि न्यूरोडेव्हलपमेंटल विकारांसारखे विविध अपंगत्व प्रकार असतात. अशा जटिल समस्यांचे निराकरण करणाऱ्या मंत्रालयाचा कारभार तर नीट चालायला हवा. पण सरकारला वेळ नाही. दिव्यांग मंत्रालयासाठी स्वतंत्र मंत्री आणि अधिकारी असणे गरजेचे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या शिक्षकांच्या समस्या तातडीने सोडवायला हव्यात. जर दिव्यांग व्यक्तींनाच इथे वर्षानुवर्षे ताटकळत बसावं लागत असेल, तर इतरांचे काय?

# निष्कर्षाऐवजी गोंधळात वाढ



एअर इंडियाच्या ड्रीमलायनर विमानाला अहमदाबाद येथे झालेल्या भीषण अपघातानंतर महिनाभराने त्यामागची कारणे शोधणारा हंगामी निष्कर्ष अहवाल आला आहे. मात्र या निष्कर्षातून काही ठोस हाती लागण्याऐवजी संदिग्धता वाढली आहे. विमान अपघात तपास यंत्रणेने काढलेल्या १५ पानी अहवालात इंधनपुरवठा खंडित झाल्यामुळे अपघात घडल्याचे समोर आले आहे.

पक्ष्यांची धडक, इंधनातील भेसळ, देखभालीतील त्रुटी, वैमानिकांची वैद्यकीय स्थिती किंवा मद्यसेवन या सर्व शक्यता या अहवालात फेटाळून लावण्यात आल्या आहेत. परंतु वैमानिकांमधील दोन वाक्यांचे संभाषण जाहीर झाल्यानंतर त्यातून वैमानिकांच्या चुकीकडे किंवा वैमानिकाने आत्मघातकी कृती केली का, याकडे अंगुलिनिर्देश करायचा होता का, असा सवाल करत वैमानिक संघटना संतप्त झाल्या आहेत. वैमानिक तर त्यांची बाजू मांडायला हयात नाहीत. 'इंधनाचा स्विच तू बंद केलास का' हा वैमानिकाचा प्रश्न आणि त्यावरचे 'मी नाही केला,' हे दुसऱ्या वैमानिकाचे उत्तर, एवढ्याच अखेरच्या संभाषणाचा संदर्भ या अहवालात आहे. त्यावरून थेट यापैकीच कुणी एकाने स्विच बंद केला, हा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

वैमानिक, विमान कर्मचारी यांचे रुबाबदार राहणे-बोलणे, त्यांचे वेतन, जीवनशैली ही आपल्याला दिसते; परंतु त्या जोडीने त्यांचे कामही तितकेच तणावपूर्ण व उच्च कौशल्याची मागणी करणारे असते. एकाग्रता, प्रसंगावधान आवश्यक असते व प्रत्येक विमानासाठी वेगवेगळे नैपुण्य गरजेचे असते. अशा परिस्थितीत केवळ हंगामी निष्कर्षांवरून वैमानिकांवर, तेही हजारो तासांचा अनुभव असलेल्या वैमानिकांवर, दोष ढकलून देणे अजिबात उचित ठरणार नाही. त्याचबरोबर तपास अहवालाची पद्धतही अधिक पारदर्शक व विश्वासार्ह करावी लागेल. या अहवालातून विमान परिचालनाची, देखभाल-दुरुस्तीची, उड्डाणपूर्व तपासणीची पद्धती यात काही तातडीचे बदल करावेत का, विमाननिर्माते, इंजिननिर्माते, एअर इंडिया यांना काही धडे गरजेचे आहेत का, याबाबतही मार्गदर्शन आवश्यक होते. ते अहवालात कुठे दिसत नाही.

अपघाताची कारणे शोधणे हे दोषनिश्चितीबरोबरच चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठीही आवश्यक असते. हवाई अपघाताला केवळ एकच कारण नसते, तर एकाहून अधिक कारणांचे ते मिश्रण असू शकते. भारतात बहरात येत असलेले विमान वाहतूक क्षेत्र अहमदाबाद अपघातानंतर धास्तावून गेले आहे. ही भीती दूर करणे व हवाई प्रवासावरची टांगती तलवार दूर करणे आवश्यक आहे. त्यासाठीच संवेदनशीलता ठेवतानाच काटेकोर निष्कर्ष हाती येण्यावरही भर द्यावा लागेल.

# प्लास्टिकच्या डब्यात साठवलेले अन्न खाणे सुरक्षित आहे का???

आपल्यापैकी अनेकांच्या घरी प्लास्टिक डबे वापरले जात असतील. महिलांना तर प्लास्टिक डब्यांविषयी विशेष प्रेम असते. तुमच्या घरातील महिलांना प्लास्टिक डबे जमा करण्याचा छंद असेल, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. प्लास्टिकच्या डब्यांमध्ये अन्न साठवून ठेवणे किंवा या डब्यांमधून अन्न खाणे चांगले आहे का? याविषयी लखनऊच्या रिजन्सी सुपरस्पेशॅलिटी हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रवीण झा यांनी सविस्तर माहिती दिली. 'प्लास्टिकच्या डब्यांमध्ये अन्न साठवून ठेवणे चांगले आहे की वाईट, हे प्लास्टिकचा प्रकार आणि त्या अन्नाचा आपण कसा वापर करतो, यावर अवलंबून असते. काही प्लास्टिक अन्नाच्या



संपर्कात आल्यानंतर धोकादायक केमिकल्स सोडतात. विशेषतः जेव्हा प्लास्टिकच्या डब्यात गरम अन्न असते' प्लास्टिकच्या डब्यांमध्ये सर्वांत जास्त वापरला जाणारा एक प्रकार म्हणजे PETE. यालाच पॉलिथिलीन टेरेपथॅलेट म्हणून ओळखले जाते. हे प्लास्टिक तुम्ही फक्त एकदा वापरू शकतात; वारंवार नाही. प्लास्टिक वापरण्यापूर्वी ते अन्नासाठी सुरक्षित आहे का, हे तपासणे गरजेचे आहे.

**कोणत्या प्रकारचे प्लास्टिक कंटेनर टाळावेत?**

प्लास्टिकच्या डब्यांमध्ये अन्न साठवणे चुकीचे नाही. पण, कोणत्या प्रकारच्या प्लास्टिक कंटेनरमध्ये अन्न साठवू नये, हे समजून घेणे गरजेचे आहे. जे पदार्थ गरम, तेलकट व आम्लयुक्त असतात, असे अन्न प्लास्टिकच्या कंटेनरमध्ये साठवल्यामुळे प्लास्टिक केमिकल्स सोडतात; जे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असते.

'जुने किंवा खराब झालेले प्लास्टिक कंटेनर वापरू नयेत. असे प्लास्टिक जास्त प्रमाणात केमिकल्स सोडू शकतात.'

प्लास्टिकच्या डब्यांमध्ये अन्न ठेवण्यापूर्वी लक्षात ठेवा या गोष्टी

प्लास्टिकच्या डब्यांमध्ये अन्न ठेवण्यासाठी 'फूड ग्रेड' किंवा 'बीपीए-फ्री' लेबल केलेले प्लास्टिक कंटेनर निवडा. BPA (Bisphenol A) हे केमिकल आहे; ज्यामुळे आरोग्य धोक्यात येऊ शकते.


प्लास्टिकचा कंटेनर कधीही मायक्रोवेव्हमध्ये ठेवू नका. कारण- उष्णतेमुळे प्लास्टिकमधून केमिकल बाहेर पडण्यास प्रोत्साहन मिळते.

खराब झालेले प्लास्टिक कंटेनर वापरणे टाळा.

वेगवेगळ्या प्लास्टिक कंटेनरसाठी वेगवेगळी मार्गदर्शक तत्त्वे असतात आणि ही मार्गदर्शक तत्त्वे प्लास्टिक सुरक्षित वापरण्यासाठी मदत करतात.

जास्त कालावधीसाठी प्लास्टिक कंटेनरचा वापर टाळा. एकदोन दिवसापर्यंत प्लास्टिक कंटेनरमध्ये अन्न साठवून ठेवू नका.

# रसमलाई




**साहित्य :** १ लीटर फुल क्रीम किंवा फुल फॅट दूध, १ टेबलस्पून साखर, २ टीस्पून व्हिनेगर, १/२ लीटर दूध, काही केशर, ४ टीस्पून साखर, एक चिमूटभर पिवळा फूड कलर, १ टेबलस्पून पिस्त्याचे तुकडे, वेलची पावडर, १ टीस्पून मैदा ( पयार्यी), 3 कप पाणी, 1 कप साखर

**कृती :** दूध मध्यम आचेवर गरम करून त्यात साखर घाला. चांगले मिसळा आणि उकळी आणा. दूध उकळायला लागल्यावर गॅस बंद करून व्हिनेगर घाला. चांगले मिसळा आणि 5 मिनिटे थांबा. एका भांड्यावर गाळणी ठेवा आणि गाळणीमध्ये स्वच्छ सुती कापड पसरवा. गाळणीतून पनीर गाळून घ्या. व्हिनेगरचा आंबटपणा काढून टाकण्यासाठी पनीर खरोखर चांगले धुवा. पनीर चांगले बांधून त्यातील सर्व पाणी काढून टाका. कढईत मध्यम आचेवर दूध गरम करून त्यात केशर, साखर, पिवळा फूड कलर, पिस्ता घाला. चांगले मिसळा आणि सुमारे 10 मिनिटे दूध उकळवा. गॅस बंद करून त्यात वेलची पूड घाला. चांगले मिसळा आणि पूर्णपणे थंड होऊ द्या. सुमारे 10-15 मिनिटे पनीर खरोखर चांगले मॅश करा. ते एकसंध मिश्रण असावे आणि त्यातून चरबी सोडली पाहिजे. तोपर्यंत पनीर मॅश करा. मैदा घालून मळून घ्या. मिश्रणाचा थोडासा भाग घ्या आणि ते गुळगुळीत आणि समान करा. कढईत पाणी गरम करून त्यात साखर घाला. जेव्हा साखर पूर्णपणे विरघळते आणि पाणी चांगले उकळते तेव्हा त्यात पनीरचे गोळे टाका. झाकण ठेवून मध्यम आचेवर सुमारे 10 मिनिटे उकळवा. गॅस बंद करून झाकण काढा. सुमारे 10 मिनिटे गोळे त्या पाण्यात राहू द्या आणि थोडे थंड करा. पनीरचे गोळे काळजीपूर्वक बाहेर काढा, त्यातील सर्व पाणी काढून टाका आणि एका भांड्यात बर्फाच्या पाण्यात टाका. स्वयंपाक प्रक्रिया पूर्णपणे थांबते आणि पनीरचे गोळे मऊ राहतात. बर्फाच्या पाण्यातून रसमलाई काढा, त्यातील सर्व पाणी काळजीपूर्वक पिळून घ्या आणि दुधात टाका. पनीरचे गोळे किमान ३-४ तास दुधात राहू द्या म्हणजे ते दूध शोषून घेतील. जेव्हा पनीरचे गोळे दूध शोषून घेतात तेव्हा रसमलाई फ्रीझमध्ये ठेवा. रसमलाई सर्व तयार आहे.

# दररोज आल्याचा सेवन केल्यावर मिळतील 'हे' जबरदस्त फायदे

आल्याचं सेवन करणं आरोग्यासाठी किती गुणकारी असंत, हे सर्वांनाच माहित आहे. आलं इतक फायदेशीर आहे की, वर्षभर आपण याचा वापर खाण्या पिण्याच्या गोष्टींमध्ये करतो. गुलाबी थंडीपासून तळपत्या गरमीच्या सकाळी आल्याचं चहा पिणे भारतात अनेकांना आवडतं. आल्याचा चहा खोकला, सदीर्मुळे कमी झालेल्या रोग प्रतिकारशक्तीला वाढवतो. तसंच प्रदुषित वातावरणात शरीराला डिटॉक्सिफाय करतो. याशिवाय ते तुमच्या शरीरा निरोगी ठेवण्यासाठीही लाभदायक आहे.

**वजन कमी करतं आल्याचा चहा :** आल्याचा चहा वजन कमी करण्यासाठी लाभदायक असतो. आल्यामध्ये असणारे गुणधर्म भूख नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि चरबी कमी करण्यास मदत करतं. जर तुम्ही आल्याचा चहा तुमच्या आहारात समाविष्ट करत असाल, तर हे वेगानं वजन कमी करण्यास मदत करतं.



**आल्यात असतात भरपूर पोषक तत्व :** आल्याला गुणकारी म्हटलं जातं. यामध्ये शरीराला आवश्यक असणारे प्रथिने, कॅल्शियम, लोह, सर्व प्रकारचे जीवनसत्व, फॉलिक ॲसिड, मॅग्नीज आणि कोलीनचा समावेश असतो. हे सर्व तत्व शरीराला मजबूत ठेवण्यासाठी मदत करतात.

**पावसाळ्यातील आजारांपासून होते सुटका :** खोकला, सर्दी, शरीरात कफ निर्माण होणे, हे सामान्य आजार आहेत. आल्याचा चहा पिल्यावर या आजारांपासून दिलासा मिळू शकतो. आल्यात ॲंटिबायोटिक गुणधर्म असतात. ज्यामुळे शरीराला याचा फायदा होतो.

**रक्तप्रवाह नियंत्रणात ठेवतं :** जर तुम्ही हाय ब्लड प्रेशरने ग्रस्त असाल, तर तुम्ही तुमच्या डाएटमध्ये आल्याच्या चहाचा समावेश केला पाहिजे. जे लोक दररोज आल्याचा चहा पितात त्यांना हायपरटेंशनचा धोका कमी असतो. तसंच ब्लड प्रेशरला नियंत्रणात ठेवण्यासाठी आल्याचा चहा खूप गुणकारी आहे.

**पचनक्रिया मजबूत ठेवण्यासाठी होते मदत :** आलं एक नैसर्गिक ॲंटिबायोटिकप्रमाणे काम करतं. खूप जास्त तेल वापरलेले पदार्थ खाल्ल्यावर पचनक्रिया बिघडते. अशातच आल्याचा चहा पिल्यावर शरीरासाठी ते फायदेशीर ठरतं. जेवणातून शरीरात येणाऱ्या बॅक्टेरिया आल्याच्या सेवनामुळं नष्ट होतात. तसंच शरीरासाठी ॲंटिसेप्टिक म्हणूनही काम करतं.

**आल्याचा चहा पिण्याचे अन्य फायदे**

१. सतत लघवीला जायची समस्या असेल, तर दिवसातून दोनवेळा आल्याचा चहा पिणे लाभदायक ठरू शकतं.
२. डोकेदुखीवर लगेच आराम मिळतो.
३. किडनी संबंधीत आजारांवर मात करण्यासाठी आल्याचा चहा गुणकारी आहे.
४. आल्याचं चहा पिल्यावर पचनक्रिया सुधारते.
५. आल्यामध्ये अनेक जीवनसत्व असतात. जीवनसत्व-अ, जीवनसत्व-ड, जीवनसत्व-ई.

# हिरव्या भाज्या स्वच्छ करण्यासाठी वापरा 'ही' पद्धत



कोणत्याही ऋतूमध्ये हिरव्या भाज्या खाणे आरोग्यासाठी फार फायदेशीर असते. हिरव्या भाज्या बनवायला सोप्या असल्या तरी मात्र, त्या साफ करणे म्हणजे मोठा टास्क असतो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला हिरव्या भाज्या स्वच्छ करण्यासाठी काही पद्धती सांगणार आहे. त्यामुळे तुमची हिरवी भाजी काही मिनिटांतच साफ करणे शक्य होईल.

**मेथीची हिरवी भाजी**

सामान्यत: लोक मेथीची प्रत्येक पाने त्याच्या मुळांपासून वेगळी करतात. परंतु, ते साफ करणे देखील अवघड आहे आणि त्याला वेळही खूप जास्त लागतो. तर मेथीची एक जुडी एका बाजूला धरून चाकूच्या सहाय्याने त्याची मुळे कापून घ्या. यामुळे मेथीची मुळे आणि माती वेगळी होईल आणि केवळ पाने राहतील.

आता ही भाजी धुण्यासाठी भांड्यात पाणी घ्या त्यात काही मिनिटे मेथी घाला म्हणजे सर्व माती त्यातून बाहेर येईल आणि नंतर ती स्वच्छ पाण्यात दोनदा धुवा. काही लोक हिरव्या भाज्या बारीक तुकडे करतात आणि धुतात परंतु, असे केल्याने हिरव्या भाज्यांचे सर्व जीवनसत्त्वे निघून जातात.

**पालकची हिरवी भाजी**

पालक साफ करण्यासाठी त्याची जुडी एका बाजूला धरा आणि चाकूच्या मदतीने पुन्हा वेगळे करा याने हिरव्या भाज्या नसलेल्या जाड देठांना वेगळे करणे सोपे जाईल. आता काही खराब पाने असल्यास त्यास वेग वेगळे करा आता पालक पाण्यात टाका १० मिनिटांनंतर स्वच्छ पाण्याने २ ते ४ वेळा धुवा.

**मोहरीची हिरवी भाजी**

मोहरीच्या हिरव्या भाज्या स्वच्छ करणे सोपे आहे. मोहरीची पाने वेगळे करा आता जर त्याची देठ थोडी कडक असेल तर आपण त्यास तळापासून सोलून देखील घेऊ शकता. मोहरीच्या हिरव्या भाज्यांमध्ये मऊ पाने वापरतात. जर देठ सोललेली असेल आणि मोठी पाने वेगळी झाली तर हिरव्या भाज्या खूप चवदार बनतात.

# लिंबूपाणी पिण्याचे आरोग्यदायी फायदे

बऱ्याचदा एखाद्या व्यक्तीला चक्कर येत असल्यास आपण त्या व्यक्तीला लिंबूपाणी देतो. यामुळे त्या व्यक्तीला थोडावेळ तरी बरे वाटते. त्यामुळे कोणत्याही आडाअडचणीला उपयोगी पडणारे लिंबू घरात आवर्जून ठेवतो. मात्र, या लिंबूपाण्याचे इतरही आरोग्यदायी फायदे आहेत. चला तर जाणून घेऊया लिंबूपाणी पिण्याचे इतर आरोग्यदायी फायदे.

**हृदयाच्या समस्येवर**

लिंबू पाणी व्हिटॅमिन सी चा चांगला स्त्रोत असल्याचे सिद्ध झाले आहे. व्हिटॅमिन सी हृदयाच्या समस्यांपासून मुक्त होतो आणि स्ट्रोकला प्रतिबंधित करतो.

**पचन शक्ती वाढते**

लिंबू, कोमट पाणी आणि मध मिसळून प्यायल्याने पचन शक्ती वाढते.

**यकृतासाठी फायदेशीर**

लिंबू हे यकृतासाठी खूप चांगले मानले जाते. लिंबू पाणी शरीरात पित्त रस तयार करण्यास मदत करते आणि शरीरातील सर्व विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते.

तोंड कोरडे होण्यापासून प्रतिबंधित

लिंबू पाणी प्यायल्याने तोंडात लाळ तयार होते आणि तोंड कोरडे होण्यापासून प्रतिबंधित होते. लिंबाचे पाणी पिण्यामुळे माणसाला ताजेतवाने वाटते आणि श्वास घेण्यास नवीन ऊर्जा मिळते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढते**

नियमित कोमट पाण्यात लिंबाचा रस मिसळून प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

**तोंडाची दुर्गंधी**

बऱ्याचदा आपण जेवण करताना कांदा, लसूण, मुळा यांचे सेवन करतो. त्यामुळे तोंडाला दुर्गंधी येते या दुर्गंधीपासून मुक्त होण्यासाठी लिंबाचे पाणी प्यायले जाते.

**त्वचेवरील डाग**

लिंबामध्ये अँटी ऑक्सिडंट गुण असतात. त्यामुळे त्वचेवरील डाग निघून जाण्यास लिंबाचा रस फायदेशीर ठरतो.





# उभ्याने करताय पाण्याचे सेवन; आजच सोडा ही सवय

पाण्याचे सेवन करणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. मात्र, बऱ्याचदा आपण बाहेरुन कुठूनही आलो की, फ्रिजचा दरवाजा उघडतो आणि तोंडाला पाण्याची बॉटल लावतो. मात्र, असे उभ्याने पाणी पिणे आरोग्यासाठी हानीकारक आहे. यामुळे आजार आपण ओढावून घेतो. चला तर जाणून घेऊया उभ्याने पाणी पिण्याचे तोटे.

**किडनीत संसर्ग होऊ शकतो**

उभ्याने पाणी प्यायल्यास ते पाणी शरीरातून थेट वाहून जाते. यामुळे त्याचा शरीराला विशेष फायदा होत नाही. तसेच उभ्याने पाण्याचे सेवन केल्याने ते वेगाने वाहून जाते. यामुळे किडनी आणि मूत्राशयातील घाण तशीच राहते. त्यामुळे मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होऊ शकतो.

**शरीरातील पदार्थ पचत नाहीत**

उभे राहून पाणी प्यायलास शरीराला त्याचा फारसा उपयोग होत नाही. त्याऐवजी बसून पाणी प्यायल्यास तुमचे स्नायू आणि मज्जासंस्थेवर जास्त ताण नसल्याने पाण्याबरोबर शरीरातील इतर पदार्थही पचण्यास मदत होते.

**स्थायूंवर दाब पडतो**

उभ्याने पाण्याचे सेवन केल्याने अन्ननलिकेच्या खालील भागावर जोरदार आघात होतो. त्यामुळे पोट आणि अन्ननलिकेला जोडणाऱ्या स्थायूंवर दाब पडतो आणि त्याला इजा पोहचण्याचा धोका असतो.

**पोटात जळजळ होते**

पाणी पोटात वेगाने येत असल्याने आम्लाची हलचाल वेगाने होते आणि ॲसिडीटीचा त्रास होतो.

**तहान पूर्णपणे भागत नाही**

उभं राहून पाणी प्यायल्यास तुम्हाला सतत थोड्या थोड्या वेळाने पाणी प्यावेसे वाटते. कारण उभं राहून पाणी प्यायल्याने तहान कधीच पूर्णपणे भागत नाही. त्यामुळेच निवांत एका जागी बसून पाणी प्यायल्यास तहान पूर्णपणे भागते.

# जाणून घ्या माठातील पाणी पिण्याचे फायदे




बऱ्याचदा आपल्याला मोठी माणसे माठातील पाणी पिण्याचा सल्ला देतात. मात्र, आपण त्याकडे दुर्लक्ष करत फ्रिजमधील थंडगार पाण्याचे सेवन करतो. यामुळे तहान देखील भागत नाही. मात्र, तेच जर तुम्ही माठातील पाण्याचे सेवन केलात तर तुम्हाला त्याचे फायदे देखील होतील. चला तर जाणून घेऊया माठातील पाणी पिण्याचे फायदे.

**घशासाठी उत्तम**

सदी, खोकला झाल्यावर आणि अस्थमा असणाऱ्यांना फ्रिजमधील थंड पाणी न पिण्याचा सल्ला दिला जातो. परंतु, माठातील थंडगार पाणी तुम्ही पिऊ शकता. कारण ते पाणी घशासाठी चांगले असते.

**उष्माघाताला आळा**

उन्हाळ्यात सामान्यपणे होणाऱ्या उष्माघाताला आळा घालण्यासाठी मातीच्या माठातले पाणी प्या.

**मेटॅबॉलिझम सुधारते**

माठातील पाण्याचे सेवन केल्याने मेटॅबॉलिझम सुधारण्यास मदत होते.

**खनिजे आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक ऊर्जा मिळते**

माठ तयार करण्यासाठी ज्या मातीचा वापर केला जातो त्या मातीत भरपूर खनिजे आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक ऊर्जा असते. त्यामुळे मातीच्या माठात पाणी ठेवल्याने मातीतील हे गुणधर्म पाण्यात मिसळतात. परिणामी त्या पाण्याने तुमच्या शरीराला फायदाच होतो.

**नैसर्गिक थंडावा**

लहान छिद्र असलेल्या मातीच्या माठात पाणी नैसर्गिकरित्या थंड होण्यास मदत होते. तसेच हे पाणी पर्यावरण पूरक आहे.

# सावधान....! तुमच्यात आढळली आहेत का ब्रेस्ट कॅन्सरची 'ही' लक्षणं



ब्रेस्ट कॅन्सर (स्तनाचा कर्करोग) हा सर्वात गंभीर आजारांपैकी एक आजार आहे. हा आजार जास्त प्रमाणात महिलांमध्ये आढळून येतो. ब्रेस्ट कॅन्सर होण्यामागील कारणे आणि लक्षणे योग्य वेळी ओळखणं गरजेचं आहे. ब्रेस्ट कॅन्सर होण्यामागील प्रमुख कारण वाहतुकीदरम्यान होणारे वायु प्रदूषण असू शकतं.

ब्रेस्ट कॅन्सरची कारणं तसंच लक्षणं जाणून घेणे, हे त्यावर औषधोपचार करण्यासाठीचं पहिलं पाऊल आहे. ब्रेस्ट कॅन्सरवरील नवीन औषधोपचार पद्धती किंवा लक्षणं कशा पद्धतीनं ओळखाव्यात? असे कित्येक प्रश्न सर्वसामान्यांच्या डोक्यात येतात. तुम्हाला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. ब्रेस्ट कॅन्सरची लक्षण आढळून आल्यानंतर तातडीनं डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करून घ्यावी. शरीराच्या एखाद्या भागातील पेशींची अनियंत्रित वाढ होण्यामागील मुख्य कारण कॅन्सर असू शकतं. शरीरात कॅन्सरच्या पेशी मोठ्या प्रमाणात वाढत राहिल्यास, त्यांचा तुटलेला काही भाग रक्ताच्या माध्यमातून शरीराच्या अन्य अवयवात पोहोचतात आणि पसरतात. या प्रक्रियेस मेटास्टेसिस असं म्हटलं जातं.

मेटास्टेसिस देखील कॅन्सरचा एक टप्पा आहे. ब्रेस्ट कॅन्सरचं पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यात निदान झाल्यास त्यावर योग्य ते औषधोपचार करणं शक्य आहे.

**ब्रेस्ट कॅन्सर होण्यमागील कारणे**

१. जागतिक आरोग्य संघटनेनुसार गर्भधारणा रोखणे
२. योग्य वेळेत बाळाला जन्म न देणे
३. स्तनपान करू न देणे
४. वय वाढणं आणि बहुतांश वेळा मद्यसेवन करणं
५. अनुवांशिक स्वरूपातही ब्रेस्ट कॅन्सरची आजार होऊ शकतो
६. स्तनावर गाठ असणं
७. वेळेपूर्वीच येणाऱ्या मासिक पाळीमुळेही ब्रेस्ट कॅन्सर होऊ शकतो

**ब्रेस्ट कॅन्सरची लक्षणे**

१. स्तनाच्या आकारात बदल झाल्याची जाणीव होणे
२. स्तन किंवा बाहुंच्या खाली गाठ येणे
३. स्तन दाबल्यास वेदना होणे
४. स्तनावर सूज येणे

**स्तन कॅन्सरचा त्रास रोखण्यासाठी करा 'हे' उपाय**

१. नियमित व्यायाम आणि योगासनांचा अभ्यास करावा.
२. सूर्याच्या प्रखर किरणांपासून स्वतःचं संरक्षण करावे.
३. धूम्रपान आणि अमली पदार्थांचे सेवन करू नये
४. अधिक प्रमाणात मिठाचे सेवन करू नये
५. लाल मांस अधिक प्रमाणात खाणे टाळावे
६. गर्भनिरोधक गोळ्यांचं वारंवार सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# 'पुणे तिथे गुन्हे! लेकींवर हात टाकताना...'

## 'देवाभाऊं'चा उल्लेख करत हल्लाबोल, 'अश्लील नजरेने...'




''सरावाच्या वेळी हे गुंड पैलवान अश्लील नजरेने पाहतात, अनेकदा असभ्य शेरेबाजी करतात, फेसबुक व इन्स्टाग्रामवर मैत्री करण्यासाठी धमकी देतात, रोज घरापर्यंत पाठलाग करतात अशी पोलीस भरतीचा सराव करणाऱ्या मुलींची गंभीर तक्रार आहे. मात्र विनयभंगाच्या फियार्दीसह एवढ्या गंभीर तक्रारी असतानाही सहकार नगर ठाण्याचे पोलीस या मुलींऐवजी गुन्हेगारांना सहकार्य करत राहिले. गुन्हेगारांविरुद्ध तक्रार आल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्याची मोकळीकच पोलिसांना नसल्याने पुण्यातील गुन्हेगारी वाढली आहे. वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पुण्यात सात नवीन पोलीस ठाणी सुरू होत आहेत. मात्र राज्यकर्त्यांच्या आदेशानुसार पोलीस गुन्हेगारांच्याच पाठीशी उभे राहत असतील तर नवीन कितीही पोलीस ठाणी सुरू झाली तर त्याचा काय उपयोग? तळजाई टेकडीवर पोलीस भरतीचा सराव करणाऱ्या मुला-मुलींवर गुंड टोळक्याने केलेला हल्ला हा सुसंस्कृत म्हटल्या जाणाऱ्या पुण्याची इभ्रत घालवणारा आहे. 'पुणे तिथे काय उणे?' असे पूर्वी पुणेकर अभिमानाने म्हणायचे. मात्र अलीकडच्या काळात पुण्यात वाढलेली गुन्हेगारी पाहता ह्यपुणे तिथे गुन्हेच गुन्हे'', असे म्हणण्याची वेळ पुणेकरांवर आली आहे. 'देवाभाऊं'चे गृहखाते पुण्यातील ही ह्यभाईगिरीह्न संपवणार आहे काय?'' असा सवाल शेवटी विचारण्यात आलाय.

■**बातमी/ लेख प्रीती दीपक नाईक :** ''विद्येचे माहेरघर आणि सुसंस्कृत पुणे अशी बिरुदावली अभिमानाने मिरवणाऱ्या पुण्यात दिवसेंदिवस बोकाळत चाललेली गुन्हेगारी पाहता पुण्याची मूळ ओळखच मिटून जाते की काय, अशी भयावह परिस्थिती हल्ली पुणे शहरात निर्माण झाली आहे. पोलिसांचा गुन्हेगारांवर आणि गृहखात्याचा पोलिसांवर वचकच न राहिल्याने कधी काळी शांत असलेले पुणे आता कमालीचे अशांत बनले आहे. खून, मारामाऱ्या, बलात्कार, खंडणी वसुलीच्या घटनांमुळे पुण्यात गुंड टोळ्यांची दहशत निर्माण झाली आहे. शहराच्या विविध भागांत गुन्हेगारांच्या टोळ्या वाढीस लागल्या व त्या भागांत कायद्याचे नव्हे, तर गुन्हेगारांचेच राज्य निर्माण झाले. पोलिसांचा वचक संपल्याने गुन्हेगारांचा दबदबा वाढला व राजकीय आश्रयामुळे तर गुंडांच्या या टोळ्या मोकाट सुटल्या आहेत,'' असा टोला उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं लगावला आहे.

**जनाची वा मनाची तर लाज वाटली नाहीच, पण...**

''पुण्याच्या तळजाई टेकडीवरील ताजी घटना तर पुणे पोलिसांसाठी लांच्छनास्पद म्हणावी अशीच आहे. फिटनेस अकादमीचे दीडशे ते दोनशे तरुण-तरुणी रोज तळजाई टेकडीवर पोलीस भरतीचा सराव करण्यासाठी येतात. मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे टेकडीवर सरावासाठी आलेल्या तरुणींना सुमारे ५० ते ६० पैलवान गुंडांच्या टोळक्याने धक्काबुक्की केली. सरावाच्या मैदानावर प्रशिक्षणार्थी मुले-मुली पोहोचल्या तेव्हा अगोदरच चार गुंड मैदानात येऊन थांबले होते. इथून बाजूला सरका व आम्हाला सराव करू द्या, अशी विनंती मुलींनी या चौघांना केली असता त्यांनी सरळ या तरुणींना ढकलून धक्काबुक्की शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यापाठोपाठ अन्य ५०-६० पैलवानांचे टोळके तिथे येऊन धडकले. अकादमीतील प्रशिक्षणार्थी मुलांनी या पैलवान टोळक्याला रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही बेदम मारहाण करण्यात आली. महाराष्ट्राच्या पोलीस दलात नोकरी मिळवण्यासाठी प्रशिक्षण घेणाऱ्या लेकींवर हात टाकताना पैलवान गुंडांच्या टोळक्याला जनाची वा मनाची तर लाज वाटली नाहीच, पण पोलिसांचे भयदेखील वाटले नाही,'' असं 'सामना'च्या अग्रलेखात म्हटलं आहे.

**सरकारमधील लोकच गुन्हेगारांच्या टोळ्यांना वाचवण्याचे काम करत असतील तर...**

''गुन्हेगारांच्या मनातील भीती संपुष्टात येणे हे पोलीस प्रशासनाचे व पर्यायाने राज्याच्या गृहखात्याचे म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अपयश आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. पुण्यातील 'भाईगिरी' का वाढतेय, याचे उत्तर गृहखाते सांभाळणाऱ्या 'देवाभाऊंना' नाही तर कुणाला विचारायचे? बरे, एवढे सगळे घडल्यानंतरही पुणे पोलिसांनी गुंड टोळक्याविरुद्ध तत्काळ कोणतीही कारवाई केली नाही. पोलीस स्वतःहून तर घटनास्थळी आले नाहीच, पण विनयभंग, मारहाण, शिवीगाळ याची तक्रार घेऊन सहकार नगर पोलीस ठाण्यात गेलेल्या मुला-मुलींची पोलिसांनी साधी दखलही घेतली नाही. पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडूनही पोलिसांनी त्यांना दाद दिली नाही. अखेर या मुला-मुलींनी पोलीस आयुक्तालयात धडक दिली. मंगळवारी सकाळी ८ वाजता घटना घडलेली असतानाही सायंकाळी ७ नंतर पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला. धक्कादायक गोष्ट अशी की, या गुंडगिरी करणाऱ्या टोळक्याविरुद्ध कारवाई करू नये, यासाठी थेट मंत्रालयातूनच पोलीस अधिकाऱ्यांवर दबाव होता, अशी माहिती आता पुढे येत आहे. सरकारमधील लोकच अशा पद्धतीने गुन्हेगारांच्या टोळ्यांना वाचवण्याचे काम करत असतील तर पोलिसांना तरी दोष देऊन काय उपयोग?'' असा सवाल ठाकरेंच्या शिवसेनेनं विचारला आहे.

# वसई-विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त बदलले

■**वसई :** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी एम.एम.सुर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एम.एम. सूर्यवंशी (आयएएसःएससीएसः २०१०) हे आधी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई येथे कार्यरत होते. तर वसई-विरार महानगपालिकेचे आताचे आयुक्त अनिलकुमार पवार यांची एमएमआरएसआरए,ठाणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



## २० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

- **एम.एम.सूर्यवंशी :** (आयएएसःएससीएसः २०१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांची वसई-विरार महानगरपालिका, वसई येथे महानगरपालिका आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- **दीपा मुधोळ-मुंडे :** (आयएएसःआरआरः २०११) अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड, पुणे यांची आयुक्त, समाज कल्याण, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे.
- **नीलेश गटणे :** (आयएएसःएससीएसः २०१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे.
- **ज्ञानेश्वर खिलारी :** (आयएएसःएससीएसः २०१३) संचालक, ओबीसी, बहुजन कल्याण, पुणे यांची अतिरिक्त सेटलमेंट आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमी अभिलेख, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे.
- **अनिलकुमार पवार :** (आयएएसःएससीएसः २०१४) महानगरपालिका आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका, वसई यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, एमएमआरएसआरए, ठाणे म्हणून नियुक्त करण्यात आली आहे.
- **सतीशकुमार खडके :** (आयएएसःएससीएसः २०१४) संचालक (आपत्ती व्यवस्थापन), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.
- **भालचंद्र चव्हाण :** (आयएएसःनॉन-एससीएसः २०१९) आयुक्त, भू-सर्वेक्षण विकास संस्था, पुणे यांना संचालक (आपत्ती व्यवस्थापन), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.
- **सिद्धार्थ शुक्ला :** (आयएएसःआरआरः २०२३) दिनांक २ जुलै २०२५ रोजीच्या आदेशात बदल; म्हणजे सहाय्यक जिल्हाधिकारी, गोडपिंप्री उपविभाग, चंद्रपूर आणि प्रकल्प अधिकारी, आयटीडीपी, धारणी आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, धारणी उपविभाग, अमरावती म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.
- **विजयसिंह शंकरराव देशमुख :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस वर बढती) अतिरिक्त आयुक्त-२, छत्रपती संभाजी नगर विभाग, छत्रपती संभाजी नगर यांची अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- **विजय सहदेवराव भाकरे :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस पदावर बढती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, भंडारा यांची सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- **त्रिगुण शामराव कुलकर्णी :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस वर बढती) अतिरिक्त महासंचालक, एमईडीए, पुणे यांची यशदा, पुणे येथे उपमहासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- **गजानन धोंडीराम पाटील :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस पदावर बढती) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.
- **पंकज संतोष देवरे :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी, आयएएस म्हणून बढती) जिल्हा जात वैधता समिती, लातूर यांचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- **महेश भास्करराव पाटील :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी, आयएएस म्हणून बढती) अतिरिक्त विभागीय आयुक्त (महसूल) पुणे विभाग, पुणे यांची आयुक्त, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- **मंजिरी मधुसूदन मानोलकर :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी, आयएएस म्हणून बढती) सहआयुक्त, (पुनर्वसन), नाशिक विभाग, नाशिक यांची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- **आशा अफझल खान पठाण :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर बढती) सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर यांची सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.
- **राजलक्ष्मी सफिक शाह :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस वर बढती) अतिरिक्त विभागीय आयुक्त (जनरल), कोकण विभाग, मुंबई यांची व्यवस्थापकीय संचालक, एमएवीआयएम, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- **सोनाली नीळकंठ मुळे :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस पदावर बढती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, अमरावती यांची संचालक, ओबीसी, बहुजन कल्याण, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.
- **गजेंद्र चिमंतराव बावणे :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस पदावर बढती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, बुलढाणा यांची आयुक्त, भू सर्वेक्षण विकास संस्था, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.
- **प्रतिभा समाधान इंगळे :** (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस पदावर बढती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, सांगली यांची आयुक्त, अल्पसंख्याक विकास, छत्रपती संभाजी नगर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

# वसई-विरार पालिका क्षेत्रात येणाऱ्या जिल्हा परिषद शाळांबाबत सरकारचा मोठा निर्णय



■**विरार :** वसई-विरार शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी मुंबई येथील विधानभवनात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वसई-विरारमधील विकास प्रकल्पांच्या आढाव्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पालघर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. हेमंत सवरा, नालासोपारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजन नाईक, वसईच्या आमदार स्नेहा दुबे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात येर्णाया जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे यांचे विनामूल्य हस्तांतरण महापालिकेकडे करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकार्यांना दिले. यामुळे महानगरपालिकेला शैक्षणिक आणि आरोग्यविषयक सेवा अधिक सुसंगत पद्धतीने राबवता येणार असून नागरिकांना अधिक प्रभावी सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येर्णाया शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, इमारतींची दुरुस्ती, डिजिटल शिक्षण सुविधा, शिक्षकांची भरती यावर विशेष भर दिला जाणार आहे. या शाळांच्या व्यवस्थापनासाठी पुढील पाच वर्षांसाठी ८० टक्के शासन अनुदान देण्यात यावे, अशी मागणी आमदार राजन नाईक यांनी केली होती. या मागणीला मुख्यमंत्र्यांनी तात्काळ मान्यता दिली असून, याबाबतचा निर्णय येत्या मंत्रिमंडळ बैठकीत अधिकृतरीत्या जाहीर होण्याची शक्यता आहे.

# झाडांची छाटणीमुळे ४५ पक्षांचा मृत्यू



■**ठाणे :** गुरुवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे प्राप्त झालेल्या घटनेच्या माहितीनुसार आनंद नगर, घोडबंदर रोड या ठिकाणी ऋतू इन्क्लेव्ह सोसायटीच्या आवारात बिल्डिंग नंबर ए७ समोर सोसायटीच्या आवारात खाजगी ठेकेदाराकडून झाडांची छाटणी केल्यामुळे अनेक पक्षी घरट्यांसोबत खाली पडले होते व झाडांच्या फांद्याखाली अडकून पडले होते.यामध्ये ४५ पक्षांचा मृत्यू तर २८ पक्षी जखमी झाले आहेत. घटनास्थळी कासारवडवली पोलीस स्टेशनचे कर्मचारी, वनविभागाचे कर्मचारी, वाईल्ड वेल्फेअर असोसिएशनचे कर्मचारी, माय पाल क्लबचे कर्मचारी, वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी १ पिकअप वाहनासह उपस्थित होते. पक्षामध्ये गाय बगळा व बगळा प्रजातीचे ४५ पक्षांचा मृत्यू झाला आहे व पक्ष्यांच्या घरट्यांमध्ये असलेली असंख्य अंडी देखील फुटली आहेत तसेच २८ जखमी पक्षांना झाडांच्या फांद्या खालून बाहेर काढून उपचारासाठी खाजगी पशुवैद्यकीय दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. सदरची तक्रार संबंधित विभागामध्ये कळविण्यात आली असून, संबंधीत विभागाला लवकरात लवकर कार्यवाहीची सूचना देण्यात आली आहे.

# न्यू माहीम शाळेची इमारत मजबूत!

## फायद्यासाठी इमारत पाडत असल्याचा पालक, माजी विद्यार्थ्यांचा आरोप



■**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेची छोटाणी रोड-वर असलेली न्यू माहीम शाळेची इमारत मजबूत असून ती पाडू नये, अशी मागणी करत विद्यार्थ्यांचे पालक, माजी विद्यार्थी तसेच या परिसरातील नागरिक शुक्रवारी शाळेबाहेर एकवटले होते. तसेच, सदर शाळेची इमारत ही कोणाच्या तरी फायद्यासाठी जाणूनबुजून पाडली जात असल्याचा आरोप येथे उपस्थित पालकांनी केला. शाळेच्या इमारतीअभावी मुलांच्या शिक्षणाचा तसेच भविष्याचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याची कैफियत यावेळी पालकांनी मांडली. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी पालिकेने या शाळेच्या इमारतीला धोकादायक इमारत असे घोषित केले आहे.

मुंबई महापालिकेच्या न्यू माहिम शाळेत सुमारे २००० हून अधिक विद्यार्थी १ ली ते दहावीचे शिक्षण घेत आहेत. हे विद्यार्थी माहिम, धारावी, शाहूनगर या भागातून या ठिकाणी शिकायला येतात. दरम्यान, पालिकेने काही महिन्यांपूर्वी या शाळा इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट केले. त्यानंतर १७ डिसेंबर २०२४ रोजी शाळेची इमारत सी - १ धोकादायक श्रेणी म्हणून घोषित करण्यात येणार असल्याचे महापालिकेमार्फत सांगण्यात आले होते. तसेच, न्यू माहीम मनपा शालेय इमारत धोकादायक घोषित केल्यामुळे १६ जूनपासून कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेत प्रवेश देऊ नये, शालेय इमारतीतील सर्व शिक्षकांनी आपापल्या तासिका तळमजल्यावरील सुरक्षित वर्गखोल्यांमध्येच घ्याव्यात, तसेच मुख्याध्यापकांनी शिपायांच्या मदतीने स्थलांतरीत करायच्या सामानाबाबत सर्व कार्यवाही करावी, जेणेकरून वेळेचा अपव्यय होणार नाही, असे पालिकेकडून शाळेला सांगण्यात आले.

''न्यू माहीम शाळेची इमारत अतिशय मजबूत आहे. इमारतीच्या छताचे प्लास्टर उखडले गेले आहे. त्यांची दुरुस्ती केल्यास शाळेला काहीही धोका नाही. मात्र, शाळेला थेट धोकादायक घोषित करून जमीनदोस्त करण्याचा घाट घातला जात आहे.''

**-प्रणाली राऊत, आम आदमी पक्ष**

''शाळेतील नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांचे जवळच्या कपडा बाजारातील शाळेत आणि न्यू सायन या शाळांमध्ये स्थलांतर करण्यात आले आहे. पालिकेच्या वास्तुशास्त्रज्ञ आणि अभियंता विभागाने दिलेल्या अहवालानंतरच शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.''

**-प्राची जांभेकर, शिक्षणाधिकारी, मुंबई महानगरपालिका**

# वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत आर्थिक देवाणघेवाणीपासून सावध राहा... आर्थिक गुप्तवार्ता पथकाचे आवाहन

**फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी**

- कोणत्याही अनधिकृत व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या खासगी आश्वासनांवर विश्वास ठेवू नये.
- प्रवेश प्रक्रिया ही फक्त अधिकृत शासकीय संकेतस्थळ किंवा अधिकृत संस्थाच चालवतात, याची खात्री करावी.
- कोणत्याही आर्थिक व्यवहारात अधिकृत पावतीची मागणी करावी.
- शंका वाटल्यास तत्काळ पोलिसांकडे किंवा आर्थिक गुप्तवार्ता पथकाकडे माहिती द्यावी.

■**नवी मुंबई :** राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठीची प्रवेशप्रक्रिया पुढील आठवड्यापासून सुरू होत असून त्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई व परिसरातील अनेक शैक्षणिक संस्थांनी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन सुरू केले आहे. मात्र, या मार्गदर्शन सत्रांच्या आडून काही फसवणूक करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांनी विद्यार्थ्यांना खोट्या आश्वासनांच्या आधारावर गंडा घालण्याची शक्यता असल्याचा गंभीर इशारा आर्थिक गुप्तवार्ता पथक, नवी मुंबई यांनी दिला आहे.

या संदर्भात बोलताना पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र पाटील यांनी सांगितले की, मॅनेजमेंट कोट्यातून किंवा इतर कोणत्याही छुप्या मार्गाने वैद्यकीय प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली काही व्यक्ती किंवा संस्था




विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या पालकांना गंडा घालण्याचा प्रयत्न करत असल्याचे आढळून आले आहे.

अशा प्रकारच्या फसवणुकीपासून सर्वांनी सावध राहणे, आवश्यक आहे. त्यांनी असेही स्पष्ट केले की, जर कोणतीही व्यक्ती किंवा संस्था वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेश मिळवून देण्याच्या मोबदल्यात रोखीची मागणी करत असेल, तर संबंधित विद्यार्थ्यांनी किंवा पालकांनी तत्काळ आर्थिक गुप्तवार्ता पथक, नवी मुंबई किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. याबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

वैद्यकीय प्रवेशप्रक्रिया ही अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील बाब असून तिच्यात कोणताही अनधिकृत हस्तक्षेप किंवा आर्थिक देवाणघेवाण होणे गंभीर गुन्हा मानला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी पूर्ण दक्षता घेऊन प्रवेशप्रक्रियेचा अधिकृत मार्गच अनुसरावा, असे आर्थिक गुप्तवार्ता पथकाने स्पष्ट केले आहे. फसवणुकीपासून संरक्षण ही केवळ पोलिसांची नव्हे तर प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे, हे लक्षात घेऊन अधिक सजग आणि सतर्क राहावे, असे आवाहनही या पथकाकडून करण्यात आले आहे.

## पर्यटनासाठी आलेल्या मुंबईतील कुटुंबाचा संतापजनक प्रकार

# ८० वर्षांच्या वडिलांना गाडीत लॉक करून गेले ताजमहल फिरायला

**काय घडलं नेमकं?**

गुरुवारी सकाळी सुमारे ११:३० वाजता ताजमहलच्या पश्चिम प्रवेशद्वाराजवळील पार्किंगमध्ये एक मुंबईची नंबर प्लेट असलेली इनोवा कार उभी होती. पार्किंगमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात आलं की, गाडीत एक वृद्ध व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आहे. त्यांच्या पोटाला आणि पायाला कपड्यांनी बांधलेलं होतं. गाडीत एसीदेखील बंद होता आणि कार पूर्णपणे लॉक होती. पार्किंग कर्मचाऱ्यांनी तत्काळ आरडाओरड करून मदतीसाठी तेथील सुरक्षारक्षकांना आणि स्थानिक लोकांना बोलावलं. त्यांनी गाडीची काच फोडून त्या वृद्धाला सुखरूप बाहेर काढलं.

■**मुंबई :** आग्रा येथील प्रसिद्ध पर्यटनस्थळ ताजमहल परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुंबईहून ताजमहल पाहायला आलेल्या कुटुंबाने आपल्या वृद्ध वडिलांना गाडीतच बांधून ठेवलं. गाडी लॉक असल्याने उष्णतेने ८० वर्षीय वृद्धाची तब्येत बिघडली. मात्र, पार्किंग कर्मचाऱ्यांच्या प्रसंगवधनाने या वृद्धाचे प्राण वाचले. ही घटना ताजमहलच्या पश्चिमेकडील प्रवेशद्वाराजवळ घडली असून, सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.

**''ते माझे वडील आहेत'' म्हणत परतले कुटुंबीय –**

घटनेचा गोंधळ ऐकून काही वेळाने संबंधित कुटुंब परत आलं. पोलिसांनी चौकशी केली असता



ते सिद्धेश्वर तांदळे या व्यक्तीचे वडील असल्याचं समजलं. त्यांचं नाव हरीओम तांदळे असून त्यांना कारमधून बाहेर काढल्यावर प्रकृतीत सुधारणा झाल्याचेही पोलिसांनी सांगितले. मात्र, यानंतर सिद्धेश्वर आपल्या वडिलांना घेऊन तिथून निघून गेले. सध्या या प्रकरणात कोणतीही तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.

**पोलिसांचं म्हणणं –**

आग्रा पोलिस उपायुक्त सोनम कुमार यांनीही यासंदर्भात सांगितलं की, ''गाडीची काच फोडून वृद्ध व्यक्तीला बाहेर काढण्यात आलं. रुग्णवाहिका बोलावली होती. कार लॉक असल्याने त्यांची तब्येत बिघडली होती, पण बाहेर काढल्यानंतर प्रकृती सुधारली.''

**सोशल मीडियावर संताप –**

हे कुटुंब मुंबईतील रहिवासी आहेत. त्यांच्या गाडीवर महाराष्ट्र शासन, मुंबई पोलिस असे स्टीकर लावलेले होते. शिवाय, गाडीवर बरंच सामान देखील होतं. हे कुटुंब मुंबईहून ताजमहल फिरायला आले असावेत. वडिलांना चालणं शक्य नसेल म्हणून त्यांनी वडिलांना गाडीतच ठेवलं असेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. तथापि, सोशल मीडियावर मात्र घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला असून नेटकरी संताप व्यक्त करीत आहेत.

# इंजिनिअरिंगचा 'टॉपर' निघाला चोर

■**पुणे :** बुधवार पेठेतील सराफी पेढीतून पावणेपाच लाख रुपयांची फॉर्मिंग ज्वेलरी चोरून कर्नाटकमध्ये पळून गेलेल्या तरुणाला विश्रामबाग पोलिसांनी चार दिवसांच्या तपासानंतर अटक केली. हा तरुण कोणताही सराईत गुन्हेगार नसून, अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना 'टॉपर' राहिलेला विद्यार्थी आहे.

चोरी करणारा तरुण (वय १९) मूळचा कर्नाटकातील कोलार येथील अरनहल्ली गावातील आहे. त्याने सहा जुलैला मध्यरात्री एकच्या सुमारास, दुकानाच्या वॉशरूमच्या खिडकीतून प्रवेश करून फॉर्मिंग ज्वेलरी लंपास केली. दुसऱ्या दिवशी दुकानमालकाने विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.




विश्रामबाग पोलिस ठाण्याचे निरीक्षक संतोष पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक राजेश उसगावकर यांच्या तपास पथकाने २३० ते २५० 'सीसीटीव्ही' फुटेज तपासून आरोपीचा मागोवा घेऊन आरोपीला अटक केली. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याला न्यायालयात हजर केले असता १९ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com